


# विदर्भ प्रजासत्ताक



https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १८५ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. २२ ऑगस्ट २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## श्वानांना सार्वजनिक ठिकाणी खायला घालण्यास बंदी

### पकडण्यापासून रोखल्यास २ लाखांचा दंड; सुप्रीम कोर्टाचा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२नवी दिल्ली**

सुप्रीम कोर्टाने भटक्या श्वानांच्या मुद्द्यावर महत्त्वाचा निकाल दिला. सुप्रीम कोर्टाने ११ ऑगस्टच्या आदेशाला स्थगिती देत पिसाळलेल्या आणि आजारी श्वानांना शेल्टर होममध्ये ठेवण्यास सांगितले आहे. यापूर्वी सुप्रीम कोर्टाने दिल्ली आणि एनसीआर भागात पकडलेल्या भटक्या कुत्र्यांना शेल्टर होममध्ये टाकण्याचे आदेश दिले होते. या निर्णयानंतर देशभरात विविध ठिकाणे आंदोलने होत होती. त्यानंतर सुप्रीम कोर्टाने यासंदर्भातील याचिकेवर सुनावणी घेत महत्त्वाचा निर्णय दिला. सुप्रीम कोर्टाने पकडलेल्या श्वानांना नसबंदी आणि लसीकरणानंतर सोडण्याचे आदेश दिले आहेत. तसेच रेबीजची लागण झालेल्या किंवा ज्यांचे वर्तन आक्रमक आहे अशा श्वानांना शेल्टर होममध्येच ठेवण्यास सांगितले आहे.

भटक्या कुत्र्यांच्या मुद्द्यावर १४ ऑगस्ट रोजी न्यायमूर्ती विक्रम नाथ, न्यायमूर्ती संदीप मेहता आणि न्यायमूर्ती एन.व्ही. अंजारिया यांच्या विशेष खंडपीठाने सर्व पक्षकारांचे युक्तिवाद ऐकल्यानंतर निर्णय राखून ठेवला होता. यापूर्वी, ११ ऑगस्ट रोजी सुप्रीम कोर्टाच्या दोन न्यायाधीशांच्या खंडपीठाने श्वान चावल्याच्या आणि रेबीजच्या घटना लक्षात घेऊन



दिल्ली-एनसीआरच्या निवासी भागातून सर्व भटक्या श्वानांना पकडून ८ आठवड्यांच्या आत शेल्टर होममध्ये पाठवण्याचे आदेश दिले होते.

'महानगरपालिकेला आदेशातील कलम १२, १२.१ आणि १२.२ चे पालन करावे लागेल. श्वानांना जंतनाशक, लसीकरण इत्यादी केल्यानंतर त्याच परिसरात पकडून सोडले पाहिजे. पण आक्रमक किंवा रेबीजची लागण झालेल्या श्वानांना परत सोडले जाणार नाही. तसेच सार्वजनिक ठिकाणी कुत्र्यांना खायला घालण्यास मनाई असेल,' असे न्यायमूर्ती नाथ म्हणाले. यासाठी स्वतंत्र फीडिंग झोन तयार केले पाहिजेत. चुकीच्या आहारामुळे अनेक घटना घडल्याचे न्यायमूर्ती नाथ म्हणाले.

तसेच कोर्टाने आपल्या पूर्वीच्या आदेशात सुधारणा करत कोणतीही व्यक्ती किंवा संस्था या सेवांमध्ये अडथळा आणू नये असं सांगितले आहे. तसे केल्यास श्वानप्रेमी आणि स्वयंसेवी संस्थांना कोर्टाच्या रजिस्ट्रीमध्ये अनुक्रमे २५,००० रुपये आणि २ लाख रुपये जमा करावे लागतील.त्यानंतर आता सुनावणी करताना सुप्रीम कोर्टाने या संदर्भात केवळ दिल्लीलाच नव्हे तर इतर राज्यांनाही नोटीस बजावली आहे. आता संपूर्ण देशासाठी एक धोरण बनवले जाईल असेही सुप्रीम कोर्टाने म्हटले आहे. हे अंतरिम निर्देश आहेत. आता या प्रकरणात सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना पक्षकार बनवण्यात आले आहे. संपूर्ण देशासाठी याचा विचार केला जाईल. इतर उच्च न्यायालयांमध्येही खटले प्रलंबित आहेत. अशी सर्व प्रकरणे या न्यायालयात हस्तांतरित केली जातील जेणेकरून राष्ट्रीय धोरण बनवता येईल. गेल्या सुनावणीनंतर, आम्ही काही सुधारणा सुचवल्या आहेत, असं न्यायमूर्ती विक्रम नाथ म्हणाले.

## विधानसभेत काँग्रेसच्या उपमुख्यमंत्र्यांनी गायले आरएसएसचे प्रार्थना गीत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२बंगलेरू**

कर्नाटकचे उपमुख्यमंत्री आणि काँग्रेस नेते डीके शिवकुमार यांनी गुरुवारी (२१ ऑगस्ट) अचानक विधानसभेत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रार्थना गीत गायला सुरुवात केली. कर्नाटक विधानसभेचे अधिवेशन सुरू असताना डीके शिवकुमार यांनी ठडड चे प्रार्थना गीत 'नमस्ते सदा वत्सले मातृभूमी...' च्या काही ओळी गायल्या. सध्या हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १५ ऑगस्ट रोजी लाल किल्ल्यावरुन संघाचे कौतुक केले, तेव्हापासून काँग्रेस नेते पंतप्रधानांवर टीका करत आहेत. या विरोध करणाऱ्यांमध्ये डीके शिवकुमार आघाडीवर होते. मात्र, आता त्यांचा एक व्हिडिओ व्हायरल होत आहे, ज्यामध्ये ते विधानसभेचे अधिवेशन सुरू असताना संघाची प्रार्थना गात असल्याचे दिसत आहेत. हा व्हिडिओ पाहून अनेकांच्या भूवया उंचावल्या आहेत.

व्हिडिओ व्हायरल झाल्यावर लोकांनी विविध अंदाज बांधण्यास



सुरुवात केली आहे. काही लोक म्हणत आहेत की, हा काँग्रेस हायकमांडला थेट संदेश आहे की, जर त्यांचे ऐकले नाही, तर त्यांच्यासाठी परतीचा मार्ग अजूनही खुला आहे. आणखी एका युजरने म्हटले, हा सिद्धरामय्या यांना थेट इशारा आहे. त्यांना असे म्हणायचे आहे की, जर तुम्ही मुख्यमंत्र्यांची खुर्ची सोडली नाही, तर शिवकुमार भाजपमध्ये जाण्यास तयार आहेत.

## आरएसएस बंदी असलेली संघटना आहे का?

### मुख्यमंत्री फडणवीसांचे सुनेत्रा पवारांवरील टीकेला प्रत्युत्तर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२मुंबई**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी व राज्यसभा खासदार सुनेत्रा पवार यांनी दिल्लीत 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघा'शी संबंधित राष्ट्र सेविका समितीच्या बैठकीला हजेरी लावल्याने वाद निर्माण झाला आहे. यावरून महाविकास आघाडीतील नेत्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटावर टीका केली आहे. यासंदर्भात देवेंद्र फडणवीस यांना प्रतिक्रिया विचारण्यात आली होती.

खासदार व अभिनेत्री कंगणा रानौत यांच्या नवी दिल्लीतील निवासस्थानी संघाची महिला शाखा असलेल्या राष्ट्रसेविका समितीच्या बैठकीत सुनेत्रा पवार यांनी हजेरी लावली होती. भगवा ध्वज, डॉ. हेडगेवार, गोळवलकर आणि भारतमातेच्या तसबिरी



असलेल्या या बैठकीत सुनेत्रा पवार यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन करतानाचा फोटो समोर आला होता. यावर खासदार सुनेत्रा पवार यांनी स्पष्टीकरणही दिले होते. पत्रकारांशी संवाद साधत असलेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत स्पष्ट शब्दांत भाष्य केले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ बंदी असलेली संघटना आहे का, अशी विचारणा करत, मी स्वतः राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा स्वयंसेवक आहे आणि मला त्याचा अभिमान आहे. मला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने नेहमी राष्ट्रवाद शिकवला. समाजातील प्रत्येक व्यक्तीला सोबत घेऊन आपल्याला देशाचे कल्याण करायचे आहे, अशीच शिकवण संघाने दिली आहे. त्यामुळे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यक्रमात कुणी गेले, तर त्यावर एवढा आकांडतांडव करण्याची आवश्यकता का आहे, असा सवाल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थित केला.

## गणपतीच्या आगमनाला पावसाचा 'ताशा'

### पुढचे काही दिवस 'मुसळधार' कोसळणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

मागील चार दिवसांपासून राज्यातील काही भागात मुसळधार पाऊस सुरू होता. २७ सप्टेंबर रोजी राज्यभरात गणरायचे आगमन होणार आहे. पण या वर्षी ऐन गणेशोत्सवात मुसळधार पावसाचेही आगमन होणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, २५ ऑगस्टच्या सुमारास वायव्य बंगालच्या उपसागरात आणि उत्तर ओडिशा आणि गंगीय पश्चिम बंगालमध्ये एक नवीन कमी दाबाचे क्षेत्र तयार होण्याची शक्यता आहे. २४ ऑगस्टपासून पूर्व भारत आणि



लगतच्या भागात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे.

पुढील ७ दिवसांत कोकण आणि गोवा, मध्य महाराष्ट्रात मुसळधार पाऊस सुरू राहण्याची शक्यता आहे, तर २५ आणि २६ ऑगस्ट रोजी कोकणात खूप मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. तर पुढील ५ दिवसांत गुजरात किनाऱ्यावर आणि २२ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र किनाऱ्यावर जोरदार पृष्ठभागावरील वारे (४०-५० किमी प्रतितास वेगाने) वाहण्याची शक्यताचा असल्याचे हवामान विभागाने सांगितले.

पुढील ७ दिवसांत मध्य प्रदेश, छत्तीसगड, उप-हिमालयीन पश्चिम बंगाल आणि सिक्कीम, बिहारमध्ये काही ठिकाणी मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. २६ आणि २७ ऑगस्ट रोजी विदर्भ २२ ते २६ ऑगस्ट दरम्यान ओडिशा, झारखंड, गंगीय पश्चिम बंगाल. २२ ऑगस्ट रोजी पश्चिम मध्य प्रदेश, गंगीय पश्चिम बंगाल; २२ आणि २३ ऑगस्ट रोजी झारखंड, बिहार; २२, २५ आणि २६ ऑगस्ट रोजी ओडिशा आणि २५ ते २७ ऑगस्ट दरम्यान छत्तीसगडमध्ये काही ठिकाणी मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

२६ आणि २७ ऑगस्ट रोजी कर्नाटकच्या किनारपट्टी आणि उत्तर अंतर्गत भागात, केरळच्या किनारपट्टीवर आणि २५ आणि २६ ऑगस्ट रोजी आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीवर मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. पुढील ५ दिवसांत तामिळनाडू, आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीवर आणि यानम आणि तेलंगणात अनेक ठिकाणी गडगडाटी वादळे आणि विजांसह हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या चाणक्यगिरीला घाबरल्याने संजय राऊतांची टीका; भाजपाचा पलटवार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२मुंबई**

औरंगजेब फॅन क्लबचे प्रवक्ते संजय राऊत यांच्या पायाखालची जमीन घसरलेली आहे. विविध पक्षांना संपर्क करण्याची जबाबदारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आल्याने त्यांचे डोके ठिकाणावर नाही. मविआच्या नेत्यांना संपर्क केला की संजय राऊतांची चिडचिड वाढते. महाराष्ट्रातील मविआची पळताभुई थोडी होणार हे निश्चित आहे. देवेंद्र फडणवीस यांची चाणाक्यगिरी आपण राज्यसभा निवडणुकीत आणि विधान परिषदेच्या निवडणुकीत पाहिली आहे. त्याचमुळे संजय राऊत घाबरले आहेत, अशी टीका भाजपाकडून करण्यात आली.

देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रातील प्रमुख नेत्यांना मतांसाठी फोन केला. राजनाथ सिंह हे राष्ट्रीय पातळीवर बोलत आहेत. मात्र, आमच्यासारख्या लोकांनी हुकूमशाही विरुद्ध लढण्याची ठाम भूमिका घेतलेली आहे. त्यामुळे देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या फोनकडे आम्ही एक शिष्टाचार म्हणून पाहतो, असे ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी स्पष्ट केले. तसेच उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत इंडिया



आघाडीचे उमेदवार बी सुदर्शन रेड्डी यांना पाठिंबा दिल्याचे सांगितले. आम्हाला देवेंद्र फडणवीस यांनी चाणक्यगिरी शिकवू नये. ते महाराष्ट्राचे मतदार आहेत. मग त्यांनी धोतर नेसून जायला पाहिजे होते. देवेंद्र फडणवीस तुम्ही आम्हाला काही सांगू नये. तुम्ही एखादा मराठी माणूस उमेदवार म्हणून दिला असता तर त्यावर चर्चा झाली होऊ शकली असती. पण आता नाही. राहुल गांधी यांनी जे वातावरण देशात निर्माण केलेले आहे. त्यानंतर क्रॉस वोटिंग व्हायची शक्यता आहे, असा दावा संजय राऊत यांनी केला. यानंतर भाजपा माध्यम प्रमुख नवनाथ बन यांनी प्रतिक्रिया देताना पलटवार केला.

## राज्यातील महापालिकांची प्रभागरचना सोमवारी प्रसिद्ध होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२मुंबई**


राज्यातील राजकीय पक्षांना आणि स्थानिक पदाधिकाऱ्यांना आता निवडणुकांचे वेध लागले असून दिवाळीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे फटाके फूटणार आहेत. त्यासाठी, राज्य निवडणूक आयोग आणि प्रशासनाचं कामकाज सुरू झालं असून राज्य निवडणूक आयोगाकडून मुंबई महापालिका सह गट अ, ब आणि क वर्गातील महापालिकांच्या प्रभाग रचना २५ ऑगस्टला प्रसिद्ध करणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्ध करणे आणि त्यावर हरकती सूचना मागवणे यासाठी २२ ते २८ ऑगस्टचा वेळ देण्यात आला आहे. मात्र, काही महापालिकांचे प्रारूप प्रभाग रचना प्रस्ताव हे राज्य निवडणूक आयोगाला महापालिकांकडून उशिरा प्राप्त झाल्याने सोमवारी प्रभाग रचना प्रसिद्ध करणार असल्याची माहिती महापालिकेतील सूत्रांकडून देण्यात आली आहे.

## व्हाट्सअपवर लग्न आमंत्रणाची एपीके फाईल; ओपन करताच खात्यातील रक्कम लंपास

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२हिंगोली**

सायबर गुन्हेगारांकडून फसवणूक करण्यासाठी वेगवेगळ्या आयडिया अवलंबिल्या जातात. एखादी लिंक पाठवून त्या ओपन केल्यानंतर चुना लावला जात असतो. आता याच्या पुढे जात एपीके फाईलचा माध्यमातून खात्यातील रक्कम लंपास केल्याचा प्रकार हिंगोलीत समोर आला आहे. यात जिल्हा प्रशासनातील प्रमुख अधिकाऱ्याला लग्नाच्या आमंत्रणाची फाईल पाठवून फसवणूक करण्यात आली.

हिंगोलीत सायबर गुन्हेगाराने




जिल्हा प्रशासनातील प्रमुख अधिकाऱ्यांच्या खात्यातील पैसे लंपास केल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. हिंगोली जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागातील उपअभियंता सोमेश्वर गीते यांच्या व्हाट्सअपवर एपीके नावांची फाईल समोरच्याने पाठविली होती. यामध्ये वेडिंग ळपींळींळेप लरीव असा मजकूर होता. फाईल पाठविण्यासोबत वेलकम शादी मे जरूर आये असे देखील लिहिले होते.

दरम्यान ही फाईल अनेकांच्या व्हाट्सअप वर आपोआप शेअर झाली. त्यानंतर थेट खात्यामधून पैसे ऑनलाइन ट्रान्सफर झाल्याचे संदेश प्राप्त झाले. या प्रकारामुळे एकच खळबळ उडाली आहे. दरम्यान हिंगोलीच्या जिल्हा परिषद कार्यालयातील समाज कल्याण विभागाचे विस्तार अधिकारी मधुकर राऊत यांनी सायबर पोलिसात तक्रार दाखल केली असून एक लाख ९१ हजार रुपये लंपास झाल्याचे तक्रारीत नमूद केले आहे.

## संघाच्या शताब्दी वर्षातील विजयादशमी उत्सवात माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद मुख्य अतिथी

### संघाच्या सार्वजनिक कार्यक्रमात येणारे ते दुसरे माजी राष्ट्रपती ठरणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२नागपूर**

संघाच्या शताब्दी वर्षातील ऐतिहासिक विजयादशमी उत्सवाचे २ ऑक्टोबर रोजी नागपुरात आयोजन करण्यात आले आहे. यावेळी माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद हे मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. संघाच्या सार्वजनिक कार्यक्रमात येणारे ते दुसरे माजी राष्ट्रपती ठरणार आहेत. याअगोदर माजी



राष्ट्रपती प्रणव मुखर्जी हे तृतीय वर्ष वर्गाच्या समारोपप्रसंगी २०१८ साली नागपुरात संघस्थानी पोहोचले होते.

१९२५ साली राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची विजयादशमीच्या दिवशीच सुरुवात झाली होती. यंदा संघाचे शताब्दी वर्ष आहे. त्यामुळे देशभरात संघाकडून विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यंदाच्या विजयादशमी उत्सवाला मुख्य अतिथी कोण राहणार याबाबत स्वयंसेवकांसोबतच राजकीय व सामाजिक वर्तुळातदेखील उत्सुकता होती. संघाने दीड महिना अगोदरच याची घोषणा केली आहे. २ ऑक्टोबर रोजी रेशीमबाग मैदानावर होणाऱ्या कार्यक्रमात माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद हे मुख्य अतिथी असतील. याशिवाय संघाचे सरसंघचालक डॉ.मोहन भागवत हे स्वयंसेवकांना उद्बोधन करतील. या कार्यक्रमाअगोदर स्वयंसेवकांचे पहाटे शहरात पथसंचलन होईल, अशी माहिती संघाचे नागपूर महानगर संघचालक राजेश लोया यांनी दिली आहे.

## संपादकीय ......

# कामगारांची एकी ठरली बेस्ट, ठाकरेंची पत लागली पणाला

*बेस्ट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड या पतपेढीची निवडणूक यंदा केवळ एका सहकारी पतपेढीची निवडणूक न राहता, तिने राजकारण, माध्यमे आणि संघटन या तिन्ही पातळ्यांवर चर्चेचा गाजावाजा निर्माण केला. पण जेव्हा मतमोजणीचा पडदा सरकला, तेव्हा स्पष्ट झाले की कामगारांच्या मनात कोणासाठी जागा आहे आणि कोणाला फक्त बाहेरून कौतुकाची फुले चढवली गेली होती. शशांक राव पॅनलची दणदणीत एकहाती सत्ता आणि ठाकरे बंधूंना दणदणीत भोपळा हे समीकरण आपल्याला अनेक गोष्टींचा उलगडा करून देते.*

*माध्यमांनी या निवडणुकीकडे पाहताना थोडा वरवरचा दृष्टिकोन ठेवला. पत्रकारितेतील सोपे समीकरण असे की 'ठाकरे' नाव म्हणजे मथळा तयार. परिणामी संपूर्ण मोहिमेत माध्यमे राज-उद्धव ठाकरे युतीवरच केंद्रित राहिली. परंतु पतपेढीतील प्रत्यक्ष कामगारांच्या वेदना, त्यांच्या आशा, त्यांचे रोजचे संघर्ष आणि त्या संघर्षात कोण उभे आहे याकडे फारसे लक्ष दिले गेले नाही.*

*दोन भावांमध्ये झालेली एकी येथील कामगारांसाठी भावनिक किंवा ऐतिहासिक क्षण ठरू शकतो, अशी छाप पाडण्याचा प्रयत्न झाला. पण कामगार वर्गासाठी रक्ताच्या नात्याला तेवढे महत्त्व नाही. दैनंदिन धावपळीत, कडक उन्हात बस चालवताना किंवा पगारवाढीच्या मागणीसाठी झगडताना त्यांच्यासोबत कोण उभे राहते हे त्यांच्यासाठी महत्त्वाचे असते.*

*ठाकरे बंधूंच्या एकत्र येण्यामागे ठोस कामगारधोरण नव्हते. यामुळे कामगारांच्या हृदयात ठसले नाहीत. ठाकरे बंधू एकत्र आले म्हणजे आपोआप मते मिळतील हे गणित आता मुंबईच्या जमिनीवर लागू पडत नाही, हे यातून स्पष्ट झाले आहे. परिणामी निकाल जाहीर झाल्यावर माध्यमांना धक्का बसला. कामगारांनी माध्यमांनी दिलेल्या प्राधान्याला अजिबात भाव दिला नाही, ते त्यांनी आपल्या निर्णयातून दाखवून दिले. शिवसेनेची उभारणी गिरणगाव आणि बेस्टसारख्या कामगारांच्या आधारावर झाली होती. पण आता त्याच कामगारांनी ठाकरे बंधूंकडे पाठ फिरवली.*

*उद्धव ठाकरे गटासाठी ही मोठी धोक्याची घंटा आहे. त्यांचा आधारस्तंभ आता ढासळलेला आहे. राज ठाकरे यांच्यासाठी तर ही अधिकच लाजिरवाणी बाब आहे. त्यांनी पहिल्यांदाच कामगारांच्या या क्षेत्रात पाऊल टाकले आणि भोपळा पदरात पाडला. याचा अर्थ २०२७ मध्ये उद्धव ठाकरे गट, मनसे वा शिंदे गट कोणताही असो, त्यांना जुन्या स्मृतींवर आणि परंपरागत निष्ठेवर भरवसा ठेवता येणार नाही. कामगारांच्या प्रश्नांवर थेट पाय रोवून काम करणारे नेतेच त्यांची मते खेचू शकतील. निवडणुकीचा हा निकाल बघता शिवसेना (दोन्ही गटांसकट), मनसे आणि काँग्रेस-भाजप या सर्व पक्षांसाठी यापुढील काळात राजकारण अधिक कठीण होणार आहे.*

*मतदार आता अधिक प्रगल्भ झाले आहेत. ते केवळ आडनावावर वा भावनिक मुद्द्यांवर नाही, तर प्रत्यक्ष कामगिरीवर निर्णय घेतात हे या निवडणुकीतून दिसून आले आहे. कामगार, झोपडपट्ट्या, निम्नवर्गीय समाज या घटकांची मने जिंकण्यासाठी कोण झगडतोय, कोण खरंच लढतोय आणि कोण केवळ मंचावर भाषण करतोय यावर २०२७ मध्ये ठरणारे समीकरण असेल. या निवडणुकीत शशांक राव यांना वर्षानुवर्षे कामगारांच्या प्रश्नांवर संघर्ष करण्याचे फळ विजयातून मिळाले आहे. बससेवेतील कपात असो, कर्मचार्यांच्या पगाराचा प्रश्न असो, वा बोनसची झुंज असो त्यांनी प्रत्येकवेळी जमिनीवर उतरून लढा दिला. हा इतिहास कामगार विसरलेले नाहीत. म्हणूनच जेव्हा मतदान करण्याची वेळ आली, तेव्हा भावनांच्या आधारे नव्हे, तर विश्वासाच्या आधारे मते पडली.*

*आता शशांक राव पॅनल केवळ पतपेढीतली सत्ता मिळवून थांबणार नाही, तर त्यातून एक वेगळी राजकीय जागा निर्माण करू शकते. कामगारांचा विश्वास जिंकलेल्या संघटनेला भविष्यात महानगरपालिका, विधानसभा, अगदी लोकसभा निवडणुकीतही भूमिका बजावता येऊ शकते. संघटित कामगारांची शिस्तबद्ध मते जर ठरवून वळवली गेली, तर मुंबईसारख्या ठिकाणी त्याचा मोठा परिणाम होऊ शकतो. आता प्रश्न येतो तो भविष्यातील. शशांक राव पॅनल कामगारांच्या विश्वासावर उभे राहिले आहे. त्यामुळे यापुढे त्यांच्याकडून अपेक्षा खूप मोठ्या आहेत. पगारवाढीच्या मागण्या, सेवासुविधांचा विस्तार, निवृत्तीवेतनधारकांच्या तक्रारी, कुटुंबीयांसाठी आरोग्य सेवा अशा अनेक क्षेत्रांमध्ये राव पॅनलला ठोस पावले उचलावी लागतील.*

*कामगारांनी ज्या विश्वासाने सत्ता त्यांच्या हाती सोपवली आहे, त्याला न्याय देणे आता त्यांच्या पॅनलसमोरील खरी कसोटी आहे. बेस्ट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीसाठीही भविष्य सोपे नाही. सहकारी क्षेत्रावरचा विश्वास अनेक ठिकाणी डळमळीत झालेला आहे. आर्थिक पारदर्शकता टिकवणे, कर्जवाटपात न्याय व काटेकोर नियम पाळणे, नव्या पिढीच्या कामगारांना सहकारी पतपेढीकडे आकर्षित करणे, डिजिटलायझेशनला चालना देणे आणि भ्रष्टाचाराच्या छायेतून पूर्णपणे मुक्त होणे ही काही गंभीर आव्हाने पतपेढीसमोर आहेत. कामगारांना पतपेढीवर विश्वास ठेवायला लावायचे असेल तर शशांक राव यांच्या नेतृत्वाखालील संचालक मंडळाला या आव्हानांना प्रामाणिकपणे सामोरे जावे लागेल. त्यासाठी विजयाचे भूत तातडीने डोक्यातून काढावे लागेल.*

# उत्पादनात वाढीसाठी वेलींना वळण देणं आवश्यक, जाणून घ्या सविस्तर

**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक**

वेलींना वळण देणे म्हणजे त्यांना योग्य दिशेने वाढायला मदत करणे. वेलींना आधार (support) देण्यासाठी आणि त्या व्यवस्थित वाढाव्यात, यासाठी वळण देणे आवश्यक आहे. वेलींना आधार मिळाल्यावर, त्या योग्य दिशेने वाढतात आणि त्यांना जास्त फळे किंवा फुले लागतात, ज्यामुळे उत्पादन वाढते.




**वेल वर्गीय पिके (वेलींना वळण)**

मंडप उभारणीचे काम वेल साधारण एक ते दीड फूट उंचीचे होण्यापूर्वी पूर्ण करावे. मंडप तयार झाल्यानंतर आठ फूट उंचीची सुतळी घेऊन त्याचे एक टोक वेलाच्या खोडाजवळ तिरपी काडी रोवून त्या काडीस बांधावे.

त्या सुतळीस पीळ देऊन दुसरे टोक वेलावरील तारेस बांधावे.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

वेल सुतळीच्या साह्याने वाढत असताना बगलफूट व ताणवे काढावेत, पाने काढू नयेत.

वेलाची पाच फूट उंची झाल्यावर वेलाची बगलफूट व ताणवे काढणे थांबवावे.

मुख्य वेल मंडपावर पोहोचल्यानंतर त्याचा शेंडा खुडावा व राखलेल्या बगलफुटी वाढू द्याव्यात.

हवामानाचा अंदाज लक्षात घेता कोरडवाहू जमिनीच्या क्षेत्रात (मालेगाव, कळवण, देवळा, नांदगाव, येवला व सटाणा) वातावरणातील ओलावा संरक्षणासाठी कंपार्टमेंट बांधासारख्या संरचना तयार करा.

तसेच पडणाऱ्या पावसाचे पाणी शेतात साठवण्यासाठी उपाय योजना करावी.

उत्तर - पूर्वेकडील (मालेगाव, कळवण, देवळा, नांदगाव, येवला व सटाणा) मैदानी व अवर्षण प्रवण विभागात पडणाऱ्या पावसाचे पाणी शेतात साठवण्यासाठी उपाय योजना करावी.

**- ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि विभागीय संशोधन केंद्र, इगतपुरी**




## पोट खूपच सुटलं? चपाती बनेल फॅट कटर; कणकेत 'हा' पदार्थ कालवून करा चपात्या- पाहा बदल

**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक**

तुम्ही रोज खात असलेली पोळी अधिक पौष्टिक बनवण्यासाठी आणि वजन कमी करण्यास मदत करण्यासाठी काही सोप्या गोष्टी पिठात मिसळता येतात.ज्यामुळे तुमच्या रोजच्या जेवणात आरोग्यवर्धक बदल घडून येईल. वजन कमी करण्यासाठी चपाती खाऊ नका असं तुम्ही अनेकदा ऐकलं असेल पण चपाती रोज खाऊनही तुम्ही वजन कमी करू शकता. कसं ते समजून घेऊ.



**पिठात काय मिसळावे?**

पोळीचं पीठ मळताना त्यात फक्त गव्हाचं पीठ न घेता, त्यात इतर धान्यं आणि प्रथिनंयुक्त पदार्थ मिसळा. असं केल्याने पोळीतील फायबर (तंतूमय पदार्थ) आणि प्रथिनांचं प्रमाण वाढतं, ज्यामुळे ती पचायला हलकी होते आणि पोट जास्त वेळ भरलेलं राहतं. यामुळे भूक कमी लागते आणि आपोआपच वजन कमी व्हायला मदत होते. (ठशष) चपाती करताना काही पदार्थांचा वापर केल्यास अधिक पौष्टीक होण्यास मदत होईल आणि लगेच पचेल.

चपातीला पौष्टिक कसं बनवायचं?

**जवस**- जवसामध्ये ओमेगा-३ फॅटी ॲसिड आणि फायबर भरपूर प्रमाणात असतं. पिठात एक ते दोन चमचे जवसाची पूड मिसळल्यास पोळी अधिक आरोग्यदायी बनते.

**नाचणी**- नाचणीमध्ये कॅल्शियम आणि फायबर मोठ्या प्रमाणात आढळतं. गव्हाच्या पिठात थोडं नाचणीचं पीठ मिसळल्याने पोळीची पौष्टिकता वाढते.

**चणे**- भाजलेल्या चण्याचं पीठ (सत्तू) गव्हाच्या पिठात मिसळल्यास प्रथिनांचं प्रमाण वाढतं, जे स्नायूंच्या वाढीसाठी आवश्यक असतं.

**ओट्स**- ओट्समध्ये बीटा-ग्लुकन नावाचा फायबरचा प्रकार असतो, जो कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत करतो. ओट्सची पूड पिठात मिसळून पोळी बनवता येते.

**मेथीची पाने**- ताजी मेथी बारीक चिरून पिठात मिसळल्यास पोळीला एक वेगळाच स्वाद येतो आणि ती फायबरने परिपूर्ण होते.

**'या' पोळ्यांचे फायदे काय आहेत?**

अशा मिश्र पिठाच्या पोळ्या खाल्ल्याने फक्त वजन कमी होत नाही, तर इतरही अनेक फायदे होतात.पचन सुधारते कारण फायबर जास्त असल्यामुळे पचनक्रिया चांगली राहते आणि बद्धकोष्ठतेचा त्रास कमी होतो. पोट भरलेलं राहतं प्रथिनांमुळे पोट जास्त वेळ भरलेलं राहतं, त्यामुळे वारंवार खाण्याची इच्छा होत नाही. रक्तातील साखर नियंत्रित राहते: या पोळ्यांमुळे रक्तातील साखर हळू-हळू शोषली जाते, ज्यामुळे मधुमेहींसाठी त्या फायदेशीर ठरतात.

# अधिकाऱ्यांच्या परदेशवारीला मुख्यमंत्र्यांचा लगाम

## संबंधित संस्थेचे उत्पन्नाचे स्त्रोत सादर करावे लागणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२मुंबई-** राज्याच्या सेवेतील सनदी अधिकारी आणि सरकारी अधिकाऱ्यांच्या परदेशवारीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लगाम लावला आहे. परदेश दौऱ्याचा सरकारला काय उपयोग होणार याचा तपशील तसेच खासगी संस्थेचा दौरा असल्यास संबंधित संस्थेचे उत्पन्नाचे स्त्रोत आता अधिकाऱ्यांना सादर करावा लागणार आहे.

काही सनदी अधिकारी आणि सरकारी अधिकारी अभ्यास दौरा आणि प्रशिक्षणाच्या नावाखाली वारंवार परदेश दौरे करीत असल्याचे सरकारच्या निदर्शनास आले आहे. परदेश दौऱ्याची परवानगी घेताना सरकारला परिपूर्ण प्रस्ताव सादर केले जात नाहीत. परदेश दौऱ्याची मान्यता मिळण्यासाठी सादर होणाऱ्या कागदपत्रांमध्ये त्रुटी असतात. याशिवाय अनेक विसंगती असतात. हे टाळण्यासाठी सरकारने परदेश दौऱ्यावर जाणाऱ्या अधिकाऱ्यांसाठी काही अटी घालून दिल्या आहेत. सामान्य प्रशासन विभागाने आज (२१ ऑगस्ट) याबाबतचा शासन निर्णय जारी केला. अभ्यास दौरा




आणि प्रशिक्षण वगळता अन्य दौऱ्यांमध्ये तीन पेक्षा जास्त अधिकाऱ्यांचा दौऱ्यात समावेश करू नये, असे शासन निर्णयात म्हटले आहे.अनेकदा सरकारी अधिकारी खासगी संस्थेच्या पैशाने परदेश दौरे करतात. त्यामुळे आता अशा संस्थांच्या उत्पन्नाचा स्त्रोत शोधण्यात येणार आहे. परदेश दौऱ्याचा खर्च खासगी संस्था करणार असल्यास संबंधित संस्थेचा प्रकार, उत्पन्नाचा स्त्रोत आणि खर्चाची अंदाजित रक्कम सरकारला सादर करावी लागणार आहे. त्याशिवाय दौऱ्याचे प्रयोजन तसेच दौरा सरकारला कसा उपयुक्त ठरेल याची माहिती द्यावी लागणार आहे. काही अधिकारी परस्पर स्वतःच्या नावाने परदेश दौऱ्याची निमंत्रणे मिळवतात. त्यामुळे दौऱ्याचे निमंत्रण कोणामार्फत आले, निमंत्रण देणाऱ्या संस्थेचा तपशीलही राज्य सरकारला सादर करावा लागणार आहे.

**सनदी अधिकाऱ्यांना मंत्र्याची मान्यता-** काही सनदी अधिकारी मंत्र्यांनाही जुमानत नाहीत. त्यामुळे आता सनदी अधिकाऱ्यांचा परदेश दौरा असेल तर संबंधित अधिकाऱ्याला खात्याच्या मंत्र्यांची मान्यता घ्यावी लागणार आहे. या अटीमुळे सनदी अधिकाऱ्यांच्या परदेश दौऱ्यांवर निर्बंध येणार आहेत.

# अमरावती व भातकुली काँग्रेस कमिटीचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

## नुकसान भरपाई ची केली मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१अमरावती-**१६ ऑगस्ट ते १९ ऑगस्ट २०२५ या दरम्यान अमरावती जिल्ह्यात झालेल्या मुसळधार व ढगफुटी सदृश्य पावसामुळे शेतीचे, शेतमालाचे, घरांचे व गावागावातील रस्त्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. खरीप हंगामातील सोयाबीन, तुर आणि कपाशी या मुख्य पिकांचे ५० टक्क्यांहून अधिक नुकसान झाल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत.

अमरावती व भातकुली तालुका काँग्रेस कमेटी व पदाधिकारी यांनी या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत तातडीने पंचनामे करण्याची आणि शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये मदत जाहीर करण्याची मागणी केली आहे. संततधार पावसामुळे नदी-नाले तुडुंब भरले असून, शेतात अजूनही पाणी साचलेले आहे. अनेक गावांमध्ये घरे व गोठे पाण्यात वाहून गेली आहेत.

तसेच दळणवळणाचे रस्ते पूर्णपणे विस्कळीत झाल्याने गावोगावील जनजीवन ठप्प झाले आहे.

अमरावती व भातकुली काँग्रेस कमेटीने निवेदनात म्हटले आहे की, महसूल व कृषी विभागामार्फत तातडीने पंचनामे करून बाधित शेतकऱ्यांना व कुटुंबांना आर्थिक मदत मिळावी. रखडलेले रस्ते दुरुस्त करावेत तसेच नाला खोलीकरण करण्यात यावे अशी मागणी यावेळी करण्यात आली.



शेतकऱ्यांना मदत न मिळाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

यावेळी ॲड. अमित गावंडे,कृ.उ.बा.स. सभापती हरीश मोरे,श्रीकांत बोंडे,प्रवीण मनोहर, हरिभाऊ मोहोड यांच्या नेतृत्वात हे निवेदन देण्यात आले.

# महिला महाविद्यालयात स्पेक्ट्रम भित्तिपत्रकाचे उद्घाटन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२अमरावती -** नूतन विदर्भ शिक्षण मंडळ संचालित महिला महाविद्यालयात कनिष्ठ विभागांतर्गत इंग्रजी विभागाच्या वतीने स्पेक्ट्रम या भित्तिपत्रकाचे उद्घाटन स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर करण्यात आले.

या कार्यक्रमाला मंडळाचे ज्येष्ठ उपाध्यक्ष मा. श्री. कसबेकर, उपाध्यक्ष मा. श्री. निनाद सोमण, सहसचिव मा. श्री. प्रदीप पात्रीकर तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अरुणा वाडेकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.विद्यार्थिनींमध्ये इंग्रजी भाषेची भीती दूर करून भाषेची गोडी निर्माण व्हावी, वाचन व लेखनाची आवड वाढावी या उद्देशाने हा उपक्रम दरवर्षी राबविला जातो. प्रत्येक महिन्यात विद्यार्थिनी स्वतः वेगवेगळ्या विषयांवरील भित्तिपत्रके तयार करतात. स्वातंत्र्य दिन, शिक्षक दिन, महात्मा गांधी जयंती, स्त्री सक्षमीकरण, भारतीय संस्कृती, खेळांचे महत्त्व इत्यादी विषयांवर विचार व माहिती मांडली जाते.

या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थिनींच्या ज्ञानात भर पडून त्यांच्या भाषिक कौशल्यांचा विकास होतो, असे प्रतिपादन प्राचार्या डॉ. अरुणा वाडेकर यांनी केले. इंग्रजी विभागाच्या प्रा. अपर्णा तीनखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडतो.

नूतन विदर्भ शिक्षण मंडळाचे अध्यक्ष मा. श्री. आनंद परचुरे, सचिव श्री. हितेश व्यास व कार्यकारी मंडळ यांनी विद्यार्थिनींना शुभेच्छा दिल्या. यावेळी कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षिका प्रा. माधुरी सोनपरोते, प्रा. ममता पांडे, प्रा. मंजिरी वळसे यांच्यासह सर्व प्राध्यापक उपस्थित होते.



आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

Scan this QR code using the WhatsApp camera to join this group
क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. २२ ऑगस्ट २०२५

शहर/ग्रामिण




## ट्रान्सपोर्ट नगरातील स्क्रॅप सेंटरवर कारवाई

## ४८ लाखांचे वाहन स्पेअरपार्ट जप्त. तिघे ताब्यात



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२२अमरावती–** शहरातील ट्रान्सपोर्ट नगर येथील स्क्रैप सेंटरवर अवैधरित्या चोरीच्या चारचाकी वाहने गॅस कटरने तोडून पार्ट वेगवेगळे करून विक्रीकरीता ठेवल होते. या स्क्रॅप सेंटरवर गुन्हे शाखेने धाड टाकून ४८ लाखांचे वाहनांचे स्पेअर पार्ट व दोन संशयीत ट्रक असा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी स्पेअरपार्ट वेगवेगळे करून विक्री करणारे शेख मोहसीन शेख बशीर, युनुस खान सुलेमान खान, रशीद अहमद शेख आबीदया तिघांना ताब्यात घेतले आहे. गुन्हे शाखेचे पीआय संदिप चव्हाण यांच्या नेतृत्वात गुन्हे शाखेच्या पथकाने ही दबंग कारवाई केली.पोलीस आयुक्तालय हद्दीत तसेच जिल्ह्यात – मोठ्या प्रमाणात चारचाकी वाहने व ट्रक चोरीच्या घटना घडत अहे. ट्रान्सपोर्ट नगर येथे स्क्रॅपचे दुकानावरचोरीच्या चारचाकी वाहनाची तसेच ट्रकची अवैधरित्या गॅस कटरने कटाई करून वाहनांचे स्पेअरपार्ट वेगवेगळे करून विक्री ठेवण्यात येत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. यावरून पोलीस आयुक्त अरविद चावरिया यांच्या आदेशान्वये शहर गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांचे नेतृत्वात गुन्हे शाखेचे पथकाने गुरुवारला विशेष मोहीम राबवून कार्यवाही केली.




या कारवाईत ट्रान्सपोर्टनगर परीसरात १०० ते १५० भंगार दुकान तसेच स्क्रॅपचे दुकानांची पथकासह पाहणी केली. त्यात मोहसीन मोटरपार्टस, समीर स्क्रब सेंटर आणि एस. आर. एल स्क्र पसेंटर येथे संशयास्पदमुद्देमाल आढळला. यावरून स्क्रॅप सेंटरचे मालक आरोपी शेख मोहसीन शेख बशीर वय ३१ वर्ष, रा. जाकीर कॉलनी, युनुस खान सुलेमान खान, वय ६४ वर्ष, रा. ग्रीन पार्क कॉलनी आणि अमरावती ३. रशीद अहमद शेख आबीद, वय ३५ वर्ष, रा. जमील कॉलनी, अमरावती, यांना चौकशीसाठी ताब्यात घेतले. स्क्रॅप सेंटर मध्ये मोठ्या प्रमाणात चारचाकी वाहनाची व ट्रक ची गॅस कटरने अवैध्य रित्या कटाई करून वेगवेळे करून सदर स्पेअर पार्टस छत्रपती संभाजी नगर, नागपुर, भिवडी, भुसावळ, जालना, या ठिकाणी मोठया प्रमाणात विक्री केली जाते. या सेंटरवरून तीन ट्रक इंजिन, तीन इंजिन कव्हर, एक एयर क्लीनर, एक टक बफर, एक टक सायलेन्सर, दोन सायलेन्सर पाईप, एक ट्रक जॉइंट, एक फोर व्हीलर डॅशबोर्ड, पीकअप गाडीचा पत्रा,सायलेंसर, ट्रक–बोर्ड, ट्रक चे ऑईल टँक, गॅस कटर, फोर व्हीलर चेचीस, दोन संशयीत ट्रक असा एकूण ४८,००,००० रु. किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. तिन्ही इसमाविरुद्ध पो.स्टे.नागपुरी गेट येथे कलम ४१ (१) (४) सि. आर. पी. सी. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कामगिरी पोलीस आयुक्त अरविद चावरीया, पोलीस उपायुक्त गणेश शिदे, पोलीस उपायुक्त रमेश धुमाळ, सहाय्यक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हेशाखा चे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांचे नेतृत्वाखाली सपोनि अमोल कडु, सपोनि महेश इंगोले आदींनी केली.

## शहरातील तब्बल ५५ तडीपारांची यादी जाहिर, दिसताक्षणी ११२ वर डायल करा

### पोलिस आयुक्तालयाचे आवाहन

### आगामी सणासुदीच्या काळात पोलिसांची प्रतिबंधात्मक कारवाई




**विदर्भ प्रजासत्ताक दि.२२अमरावती** –पोलीस आयुक्तालय क्षेत्रातून गुन्हेगारी रेकॉर्डमुळे जिल्ह्यातून हद्दपार झालेल्या ५५ तडीपार गुंडांची यादी जाहीर करण्यात आली आहे. शहराच्या हद्दीत हे तडीपार आरोपी दिसताच ११२ आणि पोलीस नियंत्रण कक्षाच्या क्रमांकावर माहिती देण्याचे आवाहन पोलिस आयुक्तालयाने केले आहे. आगामी गणेशोत्सव, दुर्गोत्सव आणि महानगरपालिका निवडणुका लक्षात घेता, वरील निर्वासित लपून गुन्हेगारी कृत्ये करत असण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत, पोलिसांनी प्रतिबंधात्मक कारवाई सुरू ठेवली आहे.

तडीपार आरोपींबाबत खात्रीशीर माहिती मिळाल्यावर त्यांनी तातडीने गुन्हे शाखेशी ७९७२४७८५०० किवा नियंत्रण कक्षाच्या क्रमांक ०७२१–२५५१००० वर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. या यादीत समाविष्ट असलेले आरोपी आहेत–

१) श्रीकृष्णरामराव आखरे ३७, अंजनगाव बारी, २) भारत राजेश मगरे वय २७ वर्षे. इंदिरा नगर बडनेरा, ३) यश प्रविण गडलिग वय २२ वर्षे. पंचशील नगर अमरावती, ४) यश उर्फ गांधी विनोद तायडे वय २२ रा. कल्याण नगरं अमरावती, ५) शक्ती प्रविण वाघमारे वय २४ वर्षे रा. फ्रेजरपुरा, ६) रोहित प्रभाकर गजघाटे वय २१ वर्षे रा. यशोदानगर ७) अंकुश उर्फ लवंकुश राजेंद्र मेश्राम वय ३० रा. महादेव खोरी अमरावती, ८) सागर भगवान कोरे वय २९ वर्षे रा. संजय गांधीनगर अमरावती, ९) महेश कृष्णा खोब्रागडे वय २१ वर्षे रा. लुंबिनी नगर अमरावती, १०) शेख सोफियान शेख इलियास वय २० वर्षे. गजानन नगर अमरावती, १.१) पवन मोहन निचित वय ३० वर्षे. अर्जुन नगर अमरावती, १२) शंकर शुभ बनसोड वय ४० वर्षे रा. सिद्धार्थनगर अमरावती, १३) इर्शाद खान उर्फ बबलू गौर खान वय ३० रा. अलीस नगर अमरावती, १४) शेख राजिक शेख कुडूस वयं २९ रा. यास्मिन नगर अमरावती, १५) अमरावतीखख हजाद शेख अहसान खान हसन खान वर्ग २३ वर्षे, गुलिस्ता कलीम वय वर्ष पठाण चौक अमरावती, १७) शेख शेबाज उर्फ मुरारी शेख कलीम वय २० रा. जिब्रिल बाबा दर्गा जावल पठाणचौक अमरावती: १८) अहमद खान हसन खान वय ४४ रा. बिस्मिल्ला नगर अमरावती, १९) अमन कैलास चांडाळे वय ३२ वर्षे रा. रतनगंज अमरावती, २०) राजेश शेषराव सोळके वय २७ वर्षे, टाकोंकरपुरा वलगाव, २१) अजय नरेंद्र मेश्रामवय २५ रा. समतानगर अमरावती, २२) राजेश दादाराव पलसपगर वय ३२ वर्षे जलकाहिरापूर २३) गौतम बंडू बनसोड, रा. रेवसा २४) प्रेम यशवंत गेडाम वय १८ वर्षे. अशोक नगर वलगाव, २५) चेतन उर्फ तेजसराजू भांबूरकरवय २१ रा. समता नगर वलगाव, २६) अनिस खा अताउल्ला खान वय ३२ वर्षे. लालखापुरा नांदगाव पेठ, २७) पंकज बाळकृष्ण पांडे वय २५ रा. टाकळी जहांगीर, २८) अक्षय राजेश वानखडे वय ३२ वर्षे. कारधाबु., २९) शेख अरबाज शेख मुजीब वय २३ वर्षे. रहमत नगर अमरावती, ३०) मोबीन शाह चांद शहा वय २३ वर्षे. हैदरपुरा अमरावती, (३१) सम्माद तौसिफ सम्माद आसिफ वय २२ रा. नगर अमरावती, ३२) आकाश दिलीप मोरे रा. बेलपुरा अमरावती, ३३) रोहितयशवंत शेळके वय २२ वर्षे. शिवाजी नगर अमरावती, ३४) दीप दिनेश कपिले वय २० रा. महावीर नगर अमरावती, ३५) अक्षय भास्करराव देवीकर वय २३ वर्षे. मायानगर अमरावती, ३६) लखन गणेश शेरेकर वानखडे २२रा. चवरेनगर अमरावती, ३७) अजय गणेश वानखडे २२ रा. चवरे नगर अमरावती, (३८) अनिल उर्फ सूरज रमेशलाला कुकरेजा, (३९) इंद्रजित अजय यादव वय ३० वर्षे, नवाथे नगर अमरावती, ४०) बादल किशोर लुंडवय २५ रा. माया नगर अमरावती, ४१) सॅम उर्फ शुभम दिनेश वासनिक वय २४)बेलपुरा अमरावती, ४२) सोन्या उर्फ मंगेश भीमराव चांदूरकर वय २३ रा. केवल कॉलनी अमरावती, ४३) आदित्य रमेश आमटे वय २० रा. सरोज कॉलनी अमरावती, ४४) नवनीत संतोष पवार वय २३, हमालपुरा अमरावती, ४५) शुभम विनायक क्षीरसागर, वय ३०. महावीर नगर अमरावती, ४६) रवी अशोक इंगोळ वय १९ वर्षे रा दरोगा प्लॉट अमरावती, ४७) यश उर्फ आशिष धनराज बहुराशी वय २० वर्षे. माया नगर अमरावती, ४८) गोपीनाथ उर्फ गोलू प्रकाश चव्हाण वय २९ रा. महाजनपुरा अमरावती, ४९) गोपाळ मारोती जाधव वय २६ रा. आनंद नगर अमरावती, ५०) भूषण ओंकार विजयकर वय ३० वर्षे. खरकडीपुरा अमरावती, ५१) धीरज गंगाराम कायवाटे वय ४० वर्षे. अमरावती ५२ ) विकी गंगाराम कायवाटे वय ३८ वर्षे. अमरावती. ५३) वैभवगणेशपत्रेरा. खडकडीपुरा अमरावती, ५४) अभिजीत उर्फ गोल्या अरुणलाल पार्डीकर महाजनपुरा अमरावती, ५५) मिसाळ गंगाराम कायवाटे रा. अमरावती आदींचा समावेश आहे.

## पंचवटी चौकात पोलिसांची धडक कारवाई

### आठ किलो गांजासह तरुण व अल्पवयीन बालिका ताब्यात



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२२अमरावती :** शहरातील पंचवटी चौक परिसरात अमरावती पोलिसांनी आज धाडसी कारवाई करत अवैध गांजा विक्रीच्या साखळीला मोठा धक्का दिला. पोलिसांनी नावेद शहा नसीम शहा (वय २४, रा. करजगाव, ता. चांदूर बाजार) या तरुणासह एका विधी संघर्षग्रस्त अल्पवयीन बालिकेला ताब्यात घेतले. त्यांच्या ताब्यातून तब्बल आठ किलो गांजा जप्त करण्यात आला.मिळालेल्या माहितीनुसार, गांजाची किंमत लाखोंमध्ये असून हा साठा विक्रीसाठी आणण्यात आला होता. गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी पंचवटी चौक परिसरात सापळा रचला. त्यात नसीम शहा व अल्पवयीन बालिका पोलिसांच्या हाती लागले.या कारवाईमुळे अमली पदार्थांच्या अवैध व्यवहारावर आळा बसणार असून शहरातील तरुणाईला नशेच्या गर्तेत ओढणाऱ्या रॅकेटचा पर्दाफाश झाला आहे. आरोपींवर गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## मुख्य बस स्थानकाजवळ खाजगी बसेसचा अड्डा

### विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका, प्रादेशिक परिवहन विभागाच्या निष्क्रियतेवर प्रश्नचिन्ह



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२२अमरावती :–** शहरातील मुख्य बस स्थानकासमोर खाजगी बसांनी उभारलेला अड्डा आता गंभीर समस्या ठरत असून यामुळे वाहतुकीची कोंडी वाढली आहे. दररोज हजारो प्रवाशांसह शाळा–महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना जीवघेणा प्रवास करावा लागत आहे. शाळा सुटण्याच्या वेळेस पालकांना आपल्या मुलांसोबत सुरक्षितपणे रस्ता ओलांडणे कठीण जाते, कारण संपूर्ण रस्ता बस आणि वाहनांच्या गर्दीने व्यापलेला असतो.पालक व नागरिक यांचा आरोप आहे की या वाहनचालकांना कोणाचा तरी आशीर्वाद असल्यामुळेच मुख्य बस स्थानकासमोर थांबण्यास मोकळीक मिळते. वारंवार तक्रारी करूनही प्रशासन,प्रादेशिक परिवहन विभाग आणि ट्रॅफिक पोलिसांकडून कोणतीही ठोस कारवाई होत नाही. त्यामुळे नागरिकांचा रोष वाढला आहे.मुख्य बस स्थानक परिसरासोबतच राजापेठ चौक, बियाणी चौक, चपराशीपुरा, यशोदानगर परिसरातही अशीच परिस्थिती निर्माण होते. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेकडे संपूर्णपणे दुर्लक्ष होत असल्याने कधीही गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.नागरिक आणि पालक यांनी प्रशासनाने तातडीने कठोर उपाययोजना करून खाजगी बसांना नियमबद्ध ठिकाणी थांबवण्याची, वाहतूक पोलीस तैनात ठेवण्याची आणि शाळा परिसरात सुरक्षित पादचारी मार्ग उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. अन्यथा गंभीर दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी प्रशासनावर राहील, असा इशाराही नागरिकांकडून दिला जात आहे.

## उपवनसंरक्षक अमरावती वन विभागाची कामगिरी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२२अमरावती–** वनविभागाच्या कार्यक्षेत्रातील तपोवन टेकडी, मार्डी रोड, तेजस विहार नगर व तपोवन परिसरामध्ये गेल्या काही दिवसापासून बिबट वारंवार नागरी वस्तीमध्ये शिरून घरातील पाळीव कुत्र्यांना उचलुन नेत असल्याची माहिती प्राप्त झालेली होती. या बाबत त्वरीत अमरावती वन विभागातील वनपरिक्षेत्र (प्रा.) वडाळी, शिकार प्रतिबंधक पथक अमरावती, मानद वन्यजीव रक्षक अमरावती जिल्हा व स्थानिक स्वयंसेवी संस्थाच्या सहकार्याने सदर परिसराची पाहणी करून स्थानिक नागरिकांशी संवाद साधला यावेळी बिबट्याच्या सवयी, पर्यावरणातील त्याची भूमीका तसेच मानव वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी करावयाच्या बाबींवर कार्यशाळा घेण्यात आली, तसेच बिबट्याला जेरबंद करण्यासाठी सुयोग्य ठिकाणी पिंजरे लावण्यात आले. दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी सदर बिबट्या पिंजऱ्यात जेरबंद झाला. पशु वैद्यकीय अधिकारी यांनी सदर बिबटची वैद्यकीय तपासणी केल्यानंतर त्याला सुरक्षित रित्या त्याच्या नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले. अशी माहिती अमरावती वन विभागाचे उपवनसंरक्षक अर्जुना के. आर. यांनी दिली.

## चांदूरबाजार नगर पालीकेची नविन प्रभाग रचना

### १० प्रभाग निवडणार २० नगरसेवक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२२चांदूर बाजार:** राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार चांदूरबाजार नगर परिषदेने पालिका क्षेत्रातील प्रभागाची संख्या व त्यांची व्याप्ती निश्चीत केली असून प्रारूप मसुदा प्रसिध्द केला आहे.

चांदूरबाजार नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता २० नगरसेवकांची संख्या निश्चीत करण्यात आली असून नव्या स्चनेप्रमाणे नगराध्यक्षासह २१ सदस्य निवडले आणार आहे. दोन सदस्यीय १० प्रभाग अशा १० प्रभागातून २० सदस्य निवडून द्यावे लागणार आहे. तर नगराध्यक्षाची निवड थेट जनतेतून होणार आहे. चांदूरबाजार नगर पालिकेने प्रसिध्द झालेल्या प्रारुपावर नागरिकांना ३१ ऑगस्ट पर्यंत हरकती किवा सूचना दाखल करता येणार आहे. २०२५ च्या नगर परिषद सार्वत्रीक निवडणूकीकरीता प्रभाग रचना करण्यात आली असून प्रभाग क्र. १ लोकसंख्या १९५० अनु.जाती १०४ अनु.ज. ९६ हनुमान चौक,



शिनामाय मंदिर, महात्मा फुले सभागृह. प्रभाग क्र. २ लोकसंख्या १८५५ अ. जाती १६६ अनु ज. ०३ ग्रामीण रुग्णालय, श्रीराम मंदिर, श्रीकृष्ण मंदिर.

१९६६ अनु जाती २६१ अनु ज ४२ हिन्दु स्मशान भुमी, ख्रिश्चन प्रार्थना स्थळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान. प्रभाग क्र. ४ लोकसंख्या १७२७ अनु जाती १७२७ अनु ज. ४५९ भगवान गौतमबुध्दचौक, पिपळपुरा, संत गाडगेबाबा चौक. प्रभाग क्र. ५ लोकसंख्या लोकसंख्या २० तुकडोजी १६९८ अनु जाती २४२ अनु ज २४२ जयस्तंभचौक, काझी पुरा, हाजी कमरुद्दीन जनरल स्टोअर्स. प्रभागक्र. ६ लोकसंख्या २००० अनुजाती ७६ अनुज जुम्मा मस्जिद, राष्ट्रसंत चौक, इमामवाडा, महादेव मंदिर, कच्छी मस्जिद. प्रभाग क्र ७ लोकसंख्या २०८८ अनु जाती २४६ अनु ज ६८ मुस्लीम कब्रस्थान, कसाबपुरा, न.प. उर्दु प्राथमिक शाळा. प्रभाग क्र ८ लोकसंख्या १९३९ अनु जाती ३५३ अनु ज ६ मदरसा, भगवान गौतम बुद्ध पुतळा, बस स्थानक, दुय्यम निबंधक कार्यालय.

प्रभाग क्र ९ लोकसंख्या १९१९ अनु.जाती ६३३८ अनु ज. २८नेताजी चौक, बेलोरा चौक, इंदिरा नगर, पोलीस स्टेशन, न.प. मार्केट. प्रभाग क्र. १० लोकसंख्या १६१७ अनु जाती ३६२ अनु ज ५५ शिक्षक कॉलनी, श्रीकृष्ण कॉलनी, वृंदावन कॉलनी, सफाई कामगार वसाहत. प्रभागरचनेची विस्तृत माहीती पालीका नोटीस बोर्डवर लावलेली आहे.–

# अकोट-अकोला धावत्या रेल्वेत महिलेने दिला बाळाला जन्म

## स्थानकावर रेल्वे डॉक्टर अनुपस्थित; प्रवाशांचा संताप



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अकोला -** धावत्या अकोट-अकोला डेमू रेल्वेत एका गर्भवती महिलेने रविवारी रात्री मुलीला जन्म दिल्याची घटना घडली. अचानक प्रसूती वेदना सुरू झाल्यानंतर रेल्वे डब्यातील प्रवाशांनी आणि नातेवाइकांनी माणुसकीचे दर्शन घडवत मदत केली. मात्र, अकोला स्थानकावर रेल्वेचे डॉक्टर उपलब्ध नसल्यामुळे प्रवाशांनी रोष व्यक्त केला.

अकोट तालुक्यातील रहिवासी असलेली ही महिला आपल्या सासरच्या मंडळींसह डेमूमधून अकोल्याला येत होती. प्रवासादरम्यान तिला अचानक प्रसूतीवेदना सुरू झाल्या. रेल्वे अकोल्याच्या दिशेने धावत असतानाच महिलेने एका मुलीला जन्म दिला. त्यावेळी उपस्थित प्रवाशांनी व नातेवाइकांनी तत्परता दाखवत तिच्या प्रसूतीस मदत केली.

आरपीएफ जवान, प्रवाशांची माणुसकी रेल्वे अकोला स्थानकावर पोहोचताच आरपीएफच्या जवानांना या घटनेची माहिती मिळाली. महिला कॉन्स्टेबल आणि अधिकारी घटनास्थळी धावून आले. एएसआय संजय सुराडे, स्वस्तिमा रायबोले, ठाणेदार एम.ए. नावकार यांच्यासह प्रवासी एकता मजूर संघाच्या ममता जेरपोतवार आणि डीआरयूसीसी नांदेडचे सदस्य एजाज अहमद यांनी महिलेची सुटका करून तिला व बाळाला सुरक्षितपणे ऑटोमार्गे नजीकच्या रुग्णालयात दाखल केले. सध्या आई आणि मुलगी दोघींची प्रकृती स्थिर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

### डॉक्टरची अनुपस्थिती गंभीर बाब

अकोला स्टेशनवर रेल्वे डॉक्टरची अनुपस्थिती ही अत्यंत गंभीर बाब आहे. प्रवासादरम्यान प्रवाशांची प्रकृती बिघडली तर त्यांना तत्काळ आरोग्यसेवा पुरवण्यासाठी डॉक्टरांची उपस्थिती असणे गरजेचे आहे. या संदर्भात डीआरएम दक्षिण मध्य रेल्वेकडे तक्रार दाखल करणार आहोत.

**- एजाज अहमद, डीआरयूसीसी, नांदेड**

# अनुसूचित जमाती कल्याण समितीची शाळा, आरोग्य केंद्राला भेटी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती-** अनुसूचित जमाती कल्याण समितीने आज मेघाटातील विविध ठिकाणी भेटी दिल्या. यात समितीने शाळा, आरोग्य उपकेंद्र आदींना भेट दिली. या पाहणी दौऱ्यात समितीचे प्रमुख दौलत दरोडा यांच्यासह समितीचे सदस्य हरिशचंद्र भोये, केवलराम काळे, राजू तोडसाम, शांताराम मोरे, मंजुळा गावित, रामदास मसराम, उमा खापरे, राजेश राठोड, विनोद निकोले सहभागी झाले आहेत. आजच्या पाहणी दौऱ्यात समिती सदस्यांनी सकाळी एकलव्य मॉडेल स्कूलच्या इमारतीची पाहणी केली. यावेळी त्यांनी इमारतीची तातडीने दुरुस्ती करून शाळा सुरू करण्याच्या सूचना केल्या. त्यानंतर देवी पॉइंट येथे भेट दिली. मोथा येथील जिल्हा परिषदेच्या पूर्व माध्यमिक शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला, त्यानंतर मोथा प्राथमिक आरोग्य उपकेंद्राला भेट दिली. तसेच अंगणवाडीची पाहणी केली.

समिती सदस्यांनी मडकी येथील उमेद बचत गटाच्या स्टॉलला भेट देऊन त्यांच्या कार्याची माहिती घेतली. त्यानंतर चिखलदरा नगरपरिषदेला भेट दिली. समिती सदस्यांनी सीमाडोह वन संकुलाला भेट दिली. मेळघाटातील आकर्षण असलेल्या कोलकाज येथील विश्रामगृहाला भेट देऊन पाहणी केली. सिपणा वन्यजीवच्या उपवनसंरक्षक नीता कट्टे यांनी मेळघाट व्याघ्र प्रकल्पाबद्दल माहिती दिली.

# आर्वीत काँग्रेस कार्यकारिणीचा विस्तार : नवनियुक्त पदाधिकाऱ्यांमुळे संगठनाला बळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२आर्वी :** मागील लोकसभा व विधानसभा निवडणुकांना वर्ष उलटलं असलं तरी काँग्रेसचे संगठन स्थानिक पातळीवर ठप्प असल्याचे चित्र होते. मात्र काँग्रेसचे राष्ट्रीय समन्वयक शैलेश अग्रवाल यांचा प्रदेश कार्यकारी मंडळात समावेश झाल्यानंतर आर्वी विधानसभा क्षेत्रातल्या हालचालींना गती आली असून अलीकडेच झालेल्या नियुक्त्यांमुळे पक्ष कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झालं आहे. काँग्रेसच्या अनुसूचित विभागाच्या नागपूर येथील सम्मेलनात वर्धा जिल्हाध्यक्ष ज्वलंत मून, विभागीय अध्यक्ष राजेंद्र लाडे, प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ हत्तीअंबिरे व राष्ट्रीय अध्यक्ष माजी मंत्री राजेंद्र पाल गौतम यांच्या उपस्थितीत आर्वी तालुक्यासाठी नवे पदाधिकारी जाहीर करण्यात आले. यामध्ये पिपरीचे उपसरपंच सचिन दहाट यांची तालुका अध्यक्षपदी, महेंद्र मात्रे यांची शहराध्यक्षपदी, रवींद्र खंडारे यांची जिल्हा महासचिवपदी तर नुकतेच काँग्रेस प्रवेश केलेले राजपाल भगत यांची जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती



करण्यात आली. याप्रसंगी कार्यकर्त्यांच्या योगदानाचा गौरव करताना माजी आमदार व काँग्रेसचे ज्येष्ठ उपाध्यक्ष मुजफ्फर हुसैन यांनी सांगितले की, स्थानिक पातळीवर विरोधकांचा सामना करत पिपरी ग्रामपंचायतीचे संपूर्ण पॅनल निवडून आणण्यात सचिन दहाट व सहकाऱ्यांनी विशेष कामगिरी बजावली आहे.दरम्यान, नवनियुक्त पदाधिकारी निवडणूक प्रक्रियेत निपुण असून त्यांचा अनुभव आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये काँग्रेससाठी उपयोगी पडणार असल्याचा विश्वास काँग्रेस नेत्यांनी व्यक्त केला आहे. निवडणूक कौशल्य असलेल्या कार्यकर्त्यांच्या हाती संगठन देणे ही वेळेची गरज असल्याचे मत राष्ट्रीय समन्वयक शैलेश अग्रवाल व आमदार अभिजित वंजारी यांनी व्यक्त केले. या विस्तारामुळे आर्वी विधानसभा क्षेत्रात काँग्रेसचे संगठन अधिक मजबूत होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# राज्य महोत्सवांतर्गत महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धेचे आयोजन

## अधिकाधिक मंडळांनी सहभागी होण्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती,**
राज्यात साजरा होणारा गणेशोत्सव हा राज्य महोत्सव म्हणून साजरा करण्यात येणार असल्याची घोषणा राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केली. या महोत्सवांतर्गत, महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा राज्य, जिल्हा, तालुका या तीनही स्तरांवर होणार आहे. या स्पर्धेचे अर्ज पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी मुंबईच्या pldeshpandekalaacaderny.org या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या ganeshotsav.pldmka. co.in या पोर्टल द्वारे ऑनलाइन स्वरूपात स्वीकारले जाणार आहेत. स्पर्धेचे अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख २५ ऑगस्ट २०२५ असून, ही स्पर्धा विनामूल्य आहे. नोंदणीकृत व परवानाधारक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ या स्पर्धेत सहभागी होऊ शकतात.





विजेत्या मंडळांना तालुकास्तरावर एक, जिल्हा व राज्यस्तरावर प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकांनी गौरविले जाणार आहे. यासोबतच, महाराष्ट्रातील घरगुती गणपतीचे दर्शन, सार्वजनिक गणपतीचे दर्शन व विविध प्रसिद्ध गणेश मंदिरातील गणपतींचे लाईव्ह दर्शन अकादमीच्या वतीने तयार करण्यात आलेल्या सरपशीहेंीिरीं.श्रिवाझर.ले.ळप पोर्टलद्वारे घरबसल्या घेता येणार आहे. आपल्या घरगुती अथवा सार्वजनिक गणेशोत्सवाचे छायाचित्र या पोर्टलद्वारे विनामूल्य प्रसिद्ध करता येईल. याकरिता अधिकाधिक मंडळांनी व कुटुंबांनी आपल्या गणपतीची छायाचित्रे सरपशीहेंीिरीं.श्रिवाझर.ले.ळप या पोर्टल द्वारे प्रसिद्ध करावी व सर्वांना श्री गणरायाचे दर्शन घेता यावे असे आवाहन सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केले आहे.विविध स्पर्धा, सांस्कृतिक उपक्रम, गड किल्ले संवर्धन, राज्य व राष्ट्रीय स्मारकांचे जतन, विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन, देशी खेळांचे संवर्धन व प्रचार प्रसार, आरोग्य शिक्षण कला क्रीडा, सांस्कृतिक अशा विविध विषयांवरील कार्य, कायमस्वरूपी सामाजिक व शैक्षणिक उपक्रम, वाचनालय, महिला सक्षमीकरण, आधुनिक तंत्रज्ञानाच्या विज्ञानाच्या प्रचार व प्रसिद्धीचे कार्य, नवसंशोधन, पर्यावरण पूरक मूर्ती, सजावट व प्रदूषण रहित वातावरण अशा विविध बाबींच्या आधारे परीक्षण केले जाणार आहे.

या गणेशोत्सव स्पर्धेत अधिकाधिक संख्येने सहभागी होण्याचे आवाहन सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केले आहे.

# मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाव्दारे आरोग्य शिबिराचे आयोजन

## १२० रुग्णांची मोफत तपासणी व उपचार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती-** जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात कार्यान्वित असलेल्या मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष आणि जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने येथील राठी नगर स्थित इस्कॉन मंदिरात नुकतेच आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात १२० रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली असून आवश्यक वैद्यकीय उपचार सुविधा पुरविण्यात आली.



विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय (सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल), राजेंद्र गोळे मेडिकल कॉलेज अँड हॉस्पिटल, जनरपण ऑर्थोपेडिक हॉस्पिटल आदी रुग्णालयांनी या आरोग्य शिबिरात सक्रीय सहभाग नोंदविला. या शिबिरामध्ये एकूण १२० रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यात जनरल मेडिसिन आजारासंबंधी ६५ रुग्ण, नेत्र विभागाचे ३८ रुग्ण, ऑर्थोपेडिक विभागाचे १७ रुग्णांचा समावेश होता. शिबिर यशस्वीपणे संपन्न झाले असून मोठ्या संख्येने नागरिकांनी याचा लाभ घेतला.

राज्यात सर्वत्र स्थापन करण्यात आलेल्या मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्षाव्दारे गोर-गरीब व गरजू रुग्णांना तत्काळ मदत उपलब्ध करुन देण्याचे कार्य मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच कक्ष प्रमुख रामेश्वरजी नाईक यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात येत असून जिल्हा पातळीवर जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनात राबविले जाते, अशी माहिती अमरावतीचे कक्ष प्रमुख डॉ. श्याम गावंडे यांनी याप्रसंगी दिली. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात स्थापित या सहाय्यता निधी कक्षाकडून पुरविण्यात येणाऱ्या वैद्यकीय मदतीचा गोर-गरीब रुग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कक्ष प्रमुखांनी केले आहे.

# शेतकऱ्याच्या शेतात घुसला अजगर

## सर्पमित्रांनी सुरक्षित स्थळी केला सोडविला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२गुरू.मोझरी -**
काही दिवसांपासून सुरू असलेल्या सततच्या पावसामुळे शेतात पाणी साचले असून अनेक प्राणी व सरपटणारे जीव आपले पारंपरिक आश्रयस्थान सोडून सुरक्षित ठिकाणाच्या शोधात बाहेर पडत आहेत. या पार्श्वभूमीवर मोझरी येथील शेतकरी प्रवीण कृष्णराव पुनसे यांच्या शेतात काम करत असताना एक मोठा अजगर आढळून आला.शेतात अचानक अजगर दिसल्याने सुरुवातीला शेतकऱ्यांना भिती वाटली. मात्र त्यांनी तत्काळ धीर न सोडता स्थानिक सर्पमित्र निसार शेख यांना याबाबत कळविले. कळताच निसार शेख घटनास्थळी धाव घेऊन आले आणि तांत्रिक पद्धतीने अजगराचा सुरक्षित रेस्क्यू केला. त्यानंतर त्या अजगराला जवळच्या जंगल परिसरात सोडण्यात आले.अचानक अजगर दिसल्याने गावकऱ्यांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र सर्पमित्रांच्या तत्परतेमुळे कोणतीही हानी झाली नाही. या घटनेनंतर गावकऱ्यांनी निसार शेख यांचे मन:पूर्वक आभार मानले.तज्ज्ञांच्या मते, पावसाळ्यात अशा घटना वारंवार घडतात. शेतकरी व नागरिकांनी अशा प्रसंगी घाबरून



न जाता त्वरित स्थानिक सर्पमित्र किंवा वनविभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# विष प्राशन करून रामागड येथील शेतकऱ्याची आत्महत्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२दर्यापूर-** दर्यापूर तालुक्यातील रामागड येथील शेतकरी यादवराव माणिकराव लाजुरकर ६५ यांनी आपल्या शेतातच पोळ्याच्या पूर्वसंध्येला विष प्राशन करून जीवन यात्रा संपवली यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे त्यांची शेती पूर्ण जलमय झाली असून पूर्णता पीक नष्ट झाले आहेआणि तसेच अंगावर बँकेबरोबरच खाजगी कर्जाचा डोंगर या मनस्थिती मागचा पुढचा विचार न करता चुकीचा निर्णय घेतला त्यांच्या मागे पत्नी एक




मुलगा एक मुलगी नातवंड परिवार आहे ऐन पोळ्याच्या दिवशी एका शेतकऱ्याच्या कुटुंबाला त्यांच्यावरअंतिम संस्कार करण्याची पाळी यावी यापेक्षा दुर्दैव काय आता तरी शासनाने थोडा विशेष लक्ष देऊन कर्जमाफीसाठी प्रयत्न करावे असे मत त्याच गावचे माजी सरपंच गणेशराव राजूरकर यांनी व्यक्त केले शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर अंतिम संस्कार रामागड करण्यात आले.

# लोखंड व्यावसायिकाची ४.६७लाख रुपयांनी केली फसवणूक

## ऑनलाइन रक्कम पाठवली पण माल आलाच नाही


**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती-** लोखंड खरेदी-विक्रीचा व्यवसाय करणाऱ्या एका ६१ वर्षीय व्यावसायिकाची ४ लाख ६७हजार ६०२ रुपयांनी ऑनलाइन फसवणूक करण्यात आली. ही घटना कूड ठाण्याच्या हद्दीत समोर आली. या प्रकरणी तक्रारीवरून पोलिसांनी बुधवारी (दि. २०) अज्ञाताक्रुद्धि गुन्हा दाखल केला आहे. कूड येथील रहिवासी भगवंत गणपत आंडे (६१) हे लोखंड खरेदी-विक्रीचा व्यवसाय करतात. ते आपल्या दुकानात लोखंड खरेदीच्या संबंधाने मोबाइलवर ऑनलाइन बुकिंगकरिता माहिती बघत होते. त्यावेळी त्यांना एका



कंपनीबाबत माहिती दिसली. त्यावर त्यांनी संबंधित कंपनीचे ४ लाख ६७ हजार ६०२ रुपये किमतीच्या लोखंडाची बुकिंग केली. त्याचवेळी त्यांना एका अनोळखी क्रमांकावरून कॉल आला. समोरील व्यक्तीने त्यांना लोखंड खरेदीच्या अनुषंगाने पैसे पाठवायला सांगितले. त्यानुसार भगवंत आंडे यांनी संबंधित खात्यावर पैसे पाठवले. दरम्यान, काही दिवसांनी त्यांनी पैसे मिळाल्याची खात्री करण्यासाठी संबंधित कंपनीशी संपर्क साधला. त्यावेळी कंपनीला पैसे मिळाले नसल्याचे त्यांना समजले. त्यामुळे आपली ऑनलाइन फसवणूक झाल्याचे भगवंत आंडे यांच्या लक्षात आले. त्यांनी वरुड पोलिसांत तक्रार दाखल केली.

# नरेंद्र वानखडे, पीठेंच्या महापालिका उपायुक्त पदाला शासनाची मान्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती -** महापालिकेतील पदोन्नतीने उपयुक्त पद मिळालेले नरेंद्र वानखडे व योगेश पीठे यांच्या उपायुक्त पदाला शासनाने मान्यता दिली आहे. या दोन्ही उपायुक्तांच्या आकृतीबंधाला नगर विकास मंत्रालयाच्या सचिव विद्या हम्पय्या यांनी मान्यता दिल्याची अधिसूचना जारी केली आहे. त्यामुळे दोन्ही अधिकारी कायमस्वरूपी उपायुक्त पदावर राहतील. मनपाच्या तत्कालीन आयुक्तांनी २१



जून २०२४ रोजी नरेंद्र वानखडे यांना आकृतिबंधांतर्गत पदोन्नती देण्याचा प्रस्ताव मनपा प्रशासनाद्वारे मान्य करण्यात आला होता. त्यानंतर शासनाकडे पाठवला होता. या प्रस्तावाला २० ऑगस्ट रोजी नगर विकास मंत्रालयाने मान्यता दिली आहे. सांख्यिकी अधिकारी उपायुक्त योगेश पिठे यांना कायमस्वरूपी उपायुक्तपद देण्याचा ठराव करून मनपाद्वारे १६ मे २०२४ रोजी प्रस्ताव शासनाकडे पाठवण्यात आला होता.

# 'आयटीआय'मध्ये मुलींचे फक्त १०% प्रवेश; २२ ते २६ ऑगस्टपर्यंत केंद्रीय समुपदेशन फेरी सुरू

## राज्यभरात १४ हजार मुलींनी 'आयटीआय' साठी प्रवेश



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२मुंबई**

राज्यातील 'आयटीआय'त यंदा मुलांच्या ५१ टक्के प्रवेशाच्या तुलनेत मुलींचे प्रवेशाचे प्रमाण १० टक्के इतके कमी असल्याचे आकडेवारीवरून दिसून आले आहे. आतापर्यंत राज्यभरात १४ हजार मुलींनी 'आयटीआय' साठी प्रवेश घेतल्याची माहिती व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण संचालनालयाने दिली.

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या माहितीनुसार, राज्यात २१ ऑगस्टपर्यंत आयटीआयच्या सर्व ट्रेडसाठी एकूण १,५०,०५२ जागा उपलब्ध होत्या. त्यापैकी आतापर्यत ९१,०६० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. यामध्ये मुलांचे प्रवेश ७६,१२२ तर मुलींचे अवघे १४,९३८ इतके झाले आहेत. मुलांच्या तुलनेत मुलींच्या प्रवेशाचे प्रमाण फक्त १० टक्के असून, मुलांचे ५१ टक्के प्रवेश झाले आहे. यात मेकॅनिक विषयाकडे सर्वात कमी कल असून फक्त २,२४२ प्रवेश झाले आहेत. त्यानंतर टर्नर २,३५३, इलेक्ट्रॉनिक मेकॅनिक २,८६१ इतके प्रवेश झाले आहेत. तर वायरमनसाठी ४,८६७, मेकॅनिक मोटर व्हेईकल ४,९०३, मेकॅनिक डिझेल ५,१९१ व कॉम्प्युटर ऑपरेटर प्रोग्रामिंगसाठी ६,००० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे.

वेल्डरसाठी ९,१८८, फिटरकरिता १०,२८० तर इलेक्ट्रिशनसाठी सर्वाधिक १७,६२८ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले आहेत. सरकारी आयटीआयमध्ये एकूण ६९,७०७ प्रवेश, खासगी आयटीआयत त्या तुलनेत कमी म्हणजे २१,३५३ प्रवेश झालेले आहेत. पहिल्या कॅम्प फेरीत ४२,००० तर पाचव्या कॅम्प फेरीमध्ये फक्त एक हजारच प्रवेश झाले आहेत.

**समुपदेशन फेरी**

२२ ते २६ ऑगस्टपर्यंत आयटीआय प्रवेशासाठी केंद्रीय समुपदेशन फेरी सुरू राहणार आहे, अशी माहिती व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण संचालनालयाने दिली आहे.

# पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप अमरावती द्वारा 'भव्य गणेशउत्सव सजावट स्पर्धा २०२५' चे आयोजन

## श्रेयशदादा पोटे पाटील यांच्या हस्ते स्पर्धेची अधिकृत घोषणा व विमोचन




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप अमरावती द्वारा यावर्षी सुद्धा मोठ्या प्रमाणात 'भव्य गणेश उत्सव सजावट स्पर्धा २०२५' चे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये सार्वजनिक गणेशउत्सव मंडळ ,व्यावसायिक गणेशउत्सव मंडळ तसेच घरगुती गणेश उत्सव अश्या तीन विभागांमध्ये या स्पर्धेची विभागणी करण्यात आली आहे. या स्पर्धेची अधिकृत घोषणा व विमोचन पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप चे सचिव मा. श्रेयशदादा पोटे पाटील यांच्या हस्ते नुकताच करण्यात आले.

या गणेशउत्सव स्पर्धेकरिता साधी सरळ अशी नियमावली जाहीर करण्यात आली आहे. या स्पर्धेमध्ये भाग घेऊ इच्छिणाऱ्या स्पर्धकांना पर्यावरण पूरक, सामाजिक संदेश देणारी सजावट करायची आहे त्याचप्रमाणे त्या सजावटी चे फोटो व व्हिडीओ तयार करून आयोजकांना सबमिट करण्याकरिता www.prpotepatilengg.ac.in या वेबसाईटवर जाऊन गणेश उत्सव सजावट स्पर्धेच्या आयकॉन क्लिक करून गुगल फॉर्म मध्ये करायची आहे या भव्य सजावट स्पर्धेचा कालावधी दि. २७ सप्टेंबर २०२५ ते ०६ सप्टेंबर २०२५ पर्यंत राहील त्यामुळे भाग घेऊ इच्छिणाऱ्या स्पर्धकांनी दिलेल्या कालावधीमध्येच आपल्या घरगुती व सार्वजनिक गणेश व व्यावसायिक मंडळाचे फोटो, व्हिडीओ दिलेल्या गुगल फॉर्म वर भरून पाठवावे ०६ सप्टेंबर २०२५ नंतर आलेले साहित्य, फोटो, व्हिडीओ गृहित धरल्या जाणार नसल्याचे आयोजकांकडून कळविण्यात आले आहे.

या स्पर्धेमध्ये सार्वजनिक गणेश उत्सव मंडळ सजावटी करीता तीन बक्षीस देण्यात येणार आहे यात प्रथम पारितोषिक रोख ११०००/- रुपये , द्वितीय पारितोषिक रोख ९०००/- रुपये, तृतीय पारितोषिक रोख ७०००/- रुपये राहणार आहे. स्पर्धेमध्ये भाग घेणाऱ्या सर्वच सार्वजनिक गणेश उत्सव मंडळांना प्रोत्साहनपर बक्षीस देण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

त्याचप्रमाणे व्यावसायिक गणेश उत्सव सजावटी स्पर्धे करीता प्रथम पारितोषिक रोख ३१००/- रुपये , द्वितीय पारितोषिक रोख २१००/- रुपये, तृतीय पारितोषिक रोख ११००/- रुपये, त्याचप्रमाणे घरगुती गणेश उत्सव सजावटी करीता एकूण २१ रोख बक्षिसे व मानचिन्हे देण्यात येणार आहे त्याचप्रमाणे या स्पर्धेमध्ये भाग घेणाऱ्या सर्वांना आयोजकांमार्फत ई-प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

या स्पर्धे मध्ये अमरावती जिल्ह्यातील सार्वजनिक मंडळ गणेशउत्सव, व्यावसायिक गणेश उत्सव मंडळ व घरगुती गणेशउत्सव यांनी जास्तीत जास्त सहभाग घ्यावा असे आवाहन पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप अमरावती यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# अमरावतीत शिवसेनेतर्फे भव्य तान्हा पोळा सजावट स्पर्धा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

पाश्चिमात्य संस्कृतीकडे वाढत चाललेल्या मुलांच्या ओढीला आळा घालत, मराठी परंपरेचे जतन करण्याच्या उद्देशाने शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष) यांच्या वतीने भव्य तान्हा पोळा सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. जुनी कोतवाली, भाजी बाजार, अमरावती येथे ही स्पर्धा येत्या २३ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी ४ वाजता पार पडणार आहे.

मागील १५० वर्षांपासून चालत आलेली परंपरा जपत मुलांना तान्हा पोळा सण साजरा करण्यासाठी प्रोत्साहित करण्याच्या हेतूने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

स्पर्धेसाठी आकर्षक बक्षिसांची सोय करण्यात आली आहे.प्रथम बक्षीस : १५०१/- द्वितीय बक्षीस : १००१/-तृतीय बक्षीस : ७०१/-

विशेष म्हणजे, प्रत्येक सहभागी स्पर्धकाला बक्षीस देण्यात येणार असून त्यांच्या पालकांसाठी खास सोनेरी रंगाची ठुषी भेट देण्यात येईल.तसेच पालकांसाठी स्वतंत्र बक्षिसांचेही आयोजन करण्यात आले आहे.

१. प्रथम बक्षीस - सोन्याची नथ
२. द्वितीय बक्षीस - पैठणी साडी
३. तृतीय बक्षीस - डिनर सेट

याशिवाय महिलांसाठी मनोरंजक खेळ आणि आकर्षक बक्षिसांचे आयोजनही करण्यात आले आहे. स्पर्धेचे निर्णय हे परीक्षकांचे अंतिम असतील, असे आयोजकांनी कळविले.हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी शहर प्रमुख शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष) श्री. प्रविण हरमकरकर यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, सर्वांनी आपल्या पाल्यांसह या स्पर्धेत सहभागी होऊन मराठी सण-परंपरेला उजाळा द्यावा.

संपर्क: ९०९६३११२९८ / ९८२२७१२९९३ / ८९९९०४२१९२

# श्री. निळकंठ व्यायाम मंडळ यंदा साकारणार श्रीक्षेत्र पंढरपूर दर्शन देखावा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

श्री. निळकंठ व्यायाम मंडळ गणेशोत्सव हा अमरावतीच्या परकोटाच्या आतील प्रसिध्द असा ऐतिहासिक वारसा असलेला गणेशोत्सव आहे. श्री. निळकंठ गणेशोत्सवाची सुरवात स्वतंत्रपूर्व काळात झाली असून, खंड न पडा मंहकातर्फे उत्सव साजरा होत असतो, पंदाही श्री निळकंठ व्यायाम मंडळ गणेशोत्सवाचे आयोजन दिनांक २७ ऑगस्ट २०२५ते ७ सप्टेंबर २०२५ पर्यंत करण्यात आलेले आहे. यावर्षी अमरावतीकर बनतेसाठी 'श्रीक्षेत्र पंढरपूर दर्शन देखावा सादर करण्यात येणार आहे. मंडळाचा गणेशोत्सव हा संपूर्ण विदर्भात प्रसिध्द असुन दरवर्षी मंडळाकडून विविध देखावे सादर करण्यात येतात.

या पूर्वी गणेशोत्सवात मंडळातर्फे अष्टविनायक दर्शन, बारा ज्योतिर्लिंग, अक्षरधाम मंदिर, तिरुपती बालाजी मंदिर, सुवर्ण मंदिर ( वेल्लूर), खाटू श्याम बाबा मंदिर इत्यादी धार्मिक स्वरूपाचे देखावे साकार केले गेले, या सोबतच देशभक्तीपर देखावा मिशन चंद्रयान देख्यावाला अमरावती पोलीस आयुक्तालया तर्फे प्रथम क्रमांकाचा पुरस्कार सुद्धा प्रदान करण्यात आला. यंदाच्या श्री, क्षेत्र पंढरपूर दर्शन देखाव्याची निर्मिती जवाबदारी अकोल्याचे श्री. दीपक पवार यांना दिली गेली असून मागील अनेक वर्षांपासून श्री. पवार मंडळाचे देखावे साकार करत आले आहे.दिनांक २७ ऑगस्ट रोजी दुपारी २ वाजता श्रींची भव्य शोभायात्रा श्री. निळकंठ चौक, बुधवारा येथून सुरु होऊन सायंकाळी ६ वाजता स्थानिक राजकमल चौक येथे भव्य महाआरती चे आयोजन मंडळातर्फे करण्यात आले आहे, शोभायात्रे मध्ये मंडळाचे ढोल पथक, लेझीम संच, महिला मंडळाचा नृत्य संच, वायगाव येथील दिडी संच इस्पाती झांकी शोयायात्रेत सहभागी होणार आहे, त्यासोबतच शोभायात्रेत पंढरीचा प्रसिद्ध रिंगण सोहळ्याचे आयोजन सुला मंडळातर्फे करण्यात आले आहे.दिनांक २७ ऑगस्ट रोजी दुपारी २ वाजता श्रींची भव्य शोभायात्रा श्री. निळकंठ चौक, बुधवारा येथून सुरु होऊन सायंकाळी ६ वाजता स्थानिक राजकमल चौक येथे भव्य महाआरती चे आयोजन मंडळातर्फे करण्यात आहे आहे. शोभायात्रे मध्ये मंडळाचे ढोल पथक, लेझीम संच, महिला मंडळाचा नृत्य संच, वायगाव येथील दिडी संच इत्यादी झांकी शोयायात्रेत सहभागी होणार आहे, त्यासोबतच शोभायात्रेत पंढरीचा प्रसिद्ध रिंगण सोहळ्याचे आयोजन सुद्धा मंडळातर्फे करण्यात आले आहे.गणेशोत्सव अंतर्गत संपूर्ण १० दिवस विविध धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन गणेशोत्सव २०२५ तर्फे करण्यात आले आहे. त्या मध्ये मातृपितृ पूजन, सायकल स्वास्थ रपाली, सामुहिक वृक्षारोपण, पुणे येथील प्रसिद्ध व्याख्याते श्री. सुधीरजी धोरात व श्री. पांडुरंगजी बलकवडे यांचे व्याख्यान, अष्टपैलू स्वरसंध्या (गीत गायन कार्यक्रम), भव्य एकरूनृत्य स्पर्धा, निळकंठ जुनियर आपहरु (गीतगायन स्पर्धा), महा. रक्तदान शिबीर इत्यादी स्वरूपाचे कार्यक्रम गणेशोत्सवा तर्फे आयोजित करण्यात आले आहे. व श्रींचे विसर्जन दि-७ सप्टेंबर रोजी जुना भातकुली नका येथील निळकंठ शाळेच्या प्रांगणात होणार आहे.

तरी सर्व अमरावतीकर जनतेला मंडळातर्फे विनंती करण्यात येते कि श्री. पंढरपूर दर्शन देखाव्याला मोठ्या संखेने भेट देऊन मंडळास उपकृत करावे.

# विद्यापीठाची आचार्य पदवी पूर्व परीक्षा-२०२५; २३ व २४ ऑगस्ट रोजी

## ९ परीक्षा केंद्र, ५,०३० परीक्षार्थी देणार परीक्षा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाची आचार्य पदवी पूर्व परीक्षा-२०२५ दि. २३ व २४ ऑगस्ट, २०२५ रोजी घेण्यात येणार आहे. विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांच्या एकूण ९ परीक्षा केंद्रांवर सदर परीक्षा होणार असून, ५ हजार ३० परीक्षार्थी परीक्षा देणार आहेत. परीक्षार्थ्यांनी त्यांच्या प्रवेशपत्रासह आधार कार्ड, मतदान कार्ड आदी ओळखीचे पुरावे परीक्षेच्या वेळी आणणे आवश्यक आहे, असे विद्यापीठाच्या आचार्य कक्षाकडून कळविण्यात आले आहे.

**४ स्लॉटमध्ये होणार परीक्षा**

आचार्य पदवी पूर्व परीक्षा ही चार स्लॉटमध्ये होणार आहे. दि. २३ ऑगस्ट रोजी स्लॉट-१ मध्ये सकाळी १०.०० ते १२.०० या वेळेत होणार असून, परीक्षार्थ्यांना त्यासाठी सकाळी ९ वाजता परीक्षा केंद्रामध्ये उपस्थित रहावे लागेल. स्लॉट-२ मध्ये दुपारी ३.०० ते ५.०० या वेळेत परीक्षा होणार असून, परीक्षार्थ्यांना दुपारी २.०० वाजता परीक्षा केंद्रामध्ये उपस्थित रहावे लागेल. दिनांक २४ ऑगस्ट रोजी स्लॉट-३ मध्ये सकाळी १०.०० ते १२.०० या वेळेत परीक्षा होणार असून, परीक्षार्थ्यांना सकाळी ९ वाजता परीक्षा केंद्रामध्ये उपस्थित रहावे लागेल. स्लॉट-४ मध्ये दुपारी ३.०० ते ५.०० या वेळेत परीक्षा होईल व त्यासाठी परीक्षार्थ्यांना दुपारी २.०० वाजता परीक्षा केंद्रामध्ये उपस्थित रहावे लागेल.

परीक्षेकरिता अमरावती जिल्ह्यातील ३, अकोला जिल्हा १, बुलडाणा जिल्हा - शेगाव २, चिखली १, यवतमाळ जिल्हात २ असे एकूण ९ परीक्षा केंद्र असून, परीक्षेला ४ विद्या शाखानिहाय ५ हजार ३० परीक्षार्थी आहेत. परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी विद्यापीठाकडून जिल्हा/केंद्रनिहाय पर्यवेक्षक, निरीक्षक, जिल्हा निरीक्षक नेमण्यात आलेले आहे. त्याचबरोबर विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद, परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या सदस्यांचे दक्षता पथक जिल्हानिहाय नेमण्यात आले आहे. तसेच परीक्षेदरम्यान कोणत्याही प्रकारच्या अडचणी व समस्या येऊ नयेत, यासाठी विद्यापीठाकडून पोलीस प्रशासन, महावितरण यांना पत्राव्दारे कळविण्यात आले आहे. सर्व परीक्षार्थ्यांना कुलगुरू डॉ. मिलींद बाराहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, परीक्षा समिती अध्यक्ष, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. हेमंत देशमुख आणि आचार्य पदवी कक्षातर्फे सर्व विद्यार्थ्यांना परीक्षेच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

# अमरावती शहर कॉँग्रेस कमिटी तर्फे पोलिस आयुक्त अरविंद चावरिया यांचा सत्कार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

अमरावती शहराचे नूतन पोलिस आयुक्त श्री. अरविंद चावरिया यांचे अमरावती शहर (जिल्हा) कॉँग्रेस कमिटीच्या शिष्टमंडळाने भेट घेऊन स्वागत व अभिनंदन केले.

या प्रसंगी कॉँग्रेस नेत्यांनी शहरातील वाढत्या गुन्हेगारीवर, एम.डी. ड्रग्सच्या अवैध व्यापारावर तसेच इतर अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करून नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याचे कौतुक केले. त्यांच्या कर्तव्यनिष्ठ कार्यशैलीमुळे नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना वाढल्याचेही शिष्टमंडळाने नमूद केले.

विशेषत: एम.डी. ड्रग्सवरील कारवाईमुळे युवा पिढी व्यसनमुक्त राहण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान मिळाल्याचे कॉँग्रेस नेत्यांनी अधोरेखित केले. शिष्टमंडळाने श्री. चावरिया यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या वेळी शहर कॉँग्रेस कमिटी अध्यक्ष बबलु शेखावत यांनी शहरातील वाहतूक नियंत्रण कक्ष, सिग्नल व्यवस्था व चौकांवरील पोलिस कर्मचाऱ्यांच्या नेमणुकीबाबत मागणी केली. त्यावर आयुक्त श्री. चावरिया यांनी वाहतूक व्यवस्था अधिक सुरळीत करण्याचे आश्वासन दिले.

भेटीदरम्यान श्री. चावरिया यांनी नागरिकांच्या सहभागाचे महत्त्व अधोरेखित करत अमरावतीला सुरक्षित व समृद्ध शहर बनवण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमाला शहर कॉँग्रेस कमिटी अध्यक्ष बबलु शेखावत, माजी महापौर विलास इंगोले, मिलिंद चिमोटे, अशोक डोंगरे, बाळासाहेब भुयार, प्रदेश सचिव नजीर खान, महिला कॉँग्रेस अध्यक्षा जयश्री वानखडे, समाजसेवक राजीव भेले, तसेच माजी नगरसेवक व युवक कॉँग्रेस पदाधिकारी यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# तळेगाव ठाकूर येथे पारंपरिक उत्साहात बैलपोळा उत्सव



तळेगाव ठाकूर येथे दरवर्षीप्रमाणे यावर्षीही बैलपोळा उत्सव पारंपरिक पद्धतीने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शेतकरी बांधवांनी आपल्या शेतातील शेतमित्र बैलांना सजवून मंगल स्नान घालून त्यांची पूजा केली. गावातील प्रमुख रस्त्यावरून मिरवणुका काढण्यात आल्या. डोल-ताशांचा गजर, लेझीम, पारंपरिक वाद्यांच्या गजरात बैलांचा जल्लोष अनुभवता येत होता.ङ्गशेतकरी कुटुंबासाठी हा सण म्हणजे मेहनतीच्या जोडीदारांचा गौरव करण्याचा दिवस आहे. शेतकऱ्यांनी बैलांना हार-फुलांनी सजवून विविध स्पर्धांमध्ये सहभागी करून घेतले. महिला, युवक, तसेच बालकांनीही उत्साहात सहभाग नोंदवला.

# संत्रा उत्पादक शेतकरी व तिवसा तालुका कॉँग्रेस आक्रमक

## खरीप पिकांसह संत्रा पिकाच्या नुकसानीचे स्वतंत्र पंचनामे करण्याची मागणी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२तिवसा**

तिवसा तालुक्यात १५ ते २२ ऑगस्ट दरम्यान झालेल्या अतिवृष्टी व ढगफुटी सदृश्य पावसामुळे सोयाबीन, तूर, कपाशी या खरीप पिकांसह संत्रा पिकाचे प्रचंड नुकसान झाले. शेतकऱ्यांचा पोळ्याचा सण असतानाही शेकडो शेतकरी तहसील कार्यालयावर जमले.

कॉँग्रेस पदाधिकारी व शेतकऱ्यांनी कृषी व महसूल विभागामार्फत खरीप पिकांबरोबरच संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या नुकसानीचेही पंचनामे करून वाढीव मदत द्यावी, अशी मागणी केली.अतिवृष्टीमुळे सोयाबीनला बुरशीजन्य आजारांचा प्रादुर्भाव तर संत्रा फळबागेत फायटोपथेरा रोगामुळे मोठ्या प्रमाणावर फळगळ झाली. आर्वी तालुक्यात संत्रा उत्पादकांचे स्वतंत्र सर्वेक्षण सुरू असताना तिवसा तालुक्यात मात्र सर्वेक्षण न झाल्याबद्दल शेतकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली.तालुका कॉँग्रेस कमिटी अध्यक्ष वैभव वानखडे, सुरेशराव मेटकर, रवी राऊत, प्रफुल देशमुख यांच्यासह शेकडो शेतकरी आंदोलनात सहभागी झाले. मागणी मान्य न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा यावेळी देण्यात आला.

# गणेश उत्सवासाठी सुरक्षेला प्राधान्य देत अधिकृत वीज जोडणी घ्या

## सार्वजनिक गणेश मंडळांना घरगुती दराने वीजपुरवठा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

सार्वजनिक गणेश मंडळांना महावितरणकडून तात्पुरत्या स्वरूपात आणि त्वरित वीज जोडणीची सुविधा उपलब्ध केली आहे. या जोडणीसाठी घरगुती वीजदर आकारण्यात येणार आहे. तरी सार्वजनिक गणेश मंडळांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन अमरावती परिमंडलाचे मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी केले आहे.



**आवश्यक कागदपत्रे**

गणेश मंडळांना तात्पुरत्या स्वरूपातील वीज जोडणीसाठी नोंदणी प्रमाणपत्र, स्थानिक स्वराज्य संस्था मंडप परवानगी, पोलिस स्थानक परवाना, विद्युत निरीक्षक यांचे वीजसंच सुरक्षित असल्याचे प्रमाणपत्र, वीज मागणी अर्ज, वीजसंच मांडणी चाचणी अहवाल व राष्ट्रीयकृत बँक खाते पासबुक छायांकित प्रत इ. कागदपत्रे आवश्यक आहेत. गणेश मंडळांनी आवश्यक कागदपत्रासह नजीकच्या महावितरण कार्यालयाशी संपर्क साधावा.

**उत्सव काळात सुरक्षा महत्वाची**

गणेशोत्सव काळात कोणत्याही प्रकारचा वीज अपघात होऊ नये यासाठी मंडप, रोषणाई व देखाव्यांची उभारणी करताना लघुदाब व उच्चदाब विद्युत वाहिन्या, वितरण रोहित्रे इ. यंत्रणेपासून सुरक्षित अंतर राखावे. मंडपातील वीजसंच मांडणी करताना विद्युत सुरक्षा नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. मंडपातील वीजसंच मांडणी मान्यताप्राप्त विद्युत ठेकेदारांकडून करून घेण्यात यावी. गणेश मंडळांनी विद्युत सुरक्षा उपाययोजनांमध्ये तडजोड करू नये. आपात्कालीन स्थितीकरिता कार्यक्षेत्रातील महावितरणच्या शाखा अभियंत्यांचे मोबाईल क्रमांक नोंदवून ठेवावेत.

**अनामत रक्कम मिळणार विनाविलंब परत**

तात्पुरत्या वीजजोडणीसाठी गणेश मंडळांना मंजूर वीजभारानुसार अनामत रक्कम भरणे आवश्यक आहे. ही रक्कम ऑनलाईन भरल्यास गणेशोत्सव संपल्यावर वीजबिलाची रक्कम वगळून उरलेली रक्कम विनाविलंब परत केली जाईल. त्यामुळे गणेश मंडळांनी अनामत रक्कम ऑनलाईन पद्धतीनेच भरावी, असे आवाहनही महावितरणकडून करण्यात आले आहेआपत्कालीन स्थिती व आणिबाणीच्या परिस्थितीत सार्वजनिक गणेशोत्सव मंडळानी मदतीसाठी २४ तास सुरु असलेल्या १९१२,१९१२० तसेच १८००२१२३४३५ किंवा १८००२३३३४३५ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा. याशिवाय, संबंधित भागातील महावितरणच्या अभियंत्यांचे मोबाईल क्रमांक जवळ ठेवावेत. गणपती बाप्पाचा उत्सव साजरा करताना सुरक्षेला प्राधान्य देत एका जबाबदार मंडळाची ओळख निर्माण करूया. असे आवाहन महावितरण प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# उद्याला अमरावतीत त्रि-सेवांचा 'लॉर्ड बुद्ध सर्किट' मोटारसायकल मोहिमेचे भव्य नागरी स्वागत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

विदर्भाचे सांस्कृतिक रत्न असलेल्या ऐतिहासिक अमरावती शहरात उद्या, शनिवार दि. २३ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ४.०० वाजता त्रि-सेवांचा 'लॉर्ड बुद्ध सर्किट' मोटारसायकल मोहिमेच्या नागरी स्वागत समारंभाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. भारत, नेपाळ व श्रीलंका या तिन्ही देशांच्या सैन्य दलांच्या (उच्च पदस्थ) अधिकाऱ्यांचा सहभाग असलेली ही आंतरराष्ट्रीय मोहीम ही केवळ मोटारसायकल सफर नसून बुद्धांच्या शांततेच्या संदेशाची आणि भारताच्या संरक्षण सामर्थ्याची ऐतिहासिक तीर्थयात्रा असल्याची माहिती खा.डॉ.अनिल बोंडे ,समाजसेवक लप्पीसेठ जाजोदिया,सुनील राणा यांनी पत्रपरिषदेदरम्यान बोलतांना दिली.



नागपूरच्या पवित्र दीक्षाभूमीपासून सुरू झालेली ही मोहीम अमरावतीत पोहोचणार असून, महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाला अधोरेखित करणार आहे. जगातील तिसऱ्या क्रमांकाची बौद्ध लोकसंख्या असलेल्या महाराष्ट्रात हा कार्यक्रम आयोजित होणे हे बुद्धज्ञान परंपरेला आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना अभिवादन असल्याचे आयोजकांनी नमूद केले.

या ऐतिहासिक उपक्रमामागे त्रि-सेवांचा 'लॉर्ड बुद्ध सर्किट' मोहिमेचे सल्लागार श्री. चंद्रकुमार जाजोदिया (लप्पीभैया) यांची दूरदृष्टी, पाठबळ आणि योगदान महत्त्वाचे ठरले आहे. तसेच, सांसद डॉ. अनिल बोंडे यांनी या कार्यक्रमासाठी केंद्र सरकारकडून आवश्यक मान्यता मिळवून देण्यात महत्वाची भूमिका बजावली.

ही मोहीम महाराष्ट्र, तेलंगणा, आंध्र प्रदेश, कर्नाटक, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश व बिहार या सात राज्यांतून प्रवास करीत नेपाळमधील भगवान बुद्धांचे जन्मस्थान लुंबिनी येथे समाप्त होईल. ही मोहीम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या -लीं एरीीं धोरणाचे, BIMSTEC सहकार्याचे व सागर दृष्टिकोनाचे जिवंत प्रतीक आहे.

या समारंभात खासदार डॉ. अनिल बोंडे माजी खासदार नवनीत रवि राणा, आ. सुलभा खोडके, आ. संजय खोडके, आ. सितादीदी, संत सागर देशमुखजी, संत अशोकजी नवलानी, संत शक्ती महाराज, आ.आ. महानुभाव मोहनजी कारंजकर महाराज आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.या नागरी स्वागत समारंभाचे थेट प्रक्षेपण प्रसार भारतीमार्फत संपूर्ण देशभर होणार असून, कोट्यवधी प्रेक्षक या सांस्कृतिक, सामरिक आणि राजनयिक सोहळ्याचे साक्षीदार ठरणार आहेत.ही मोहीम ही केवळ मोटारसायकल सफर नाही, तर भारताचे सांस्कृतिक देणे आहे. येथे सशस्त्र दलांचे शौर्य आणि भगवान बुद्धांची करुणा यांचा संगम पाहायला मिळेल, असे आयोजकांनी सांगितले.

### अमरावती शहरात असा असणार त्रि-सेवांचा 'लॉर्ड बुद्ध सर्किट' मोटारसायकल मोहिमेचा प्रवास

दुपारी पंचवटी चौक येथे भव्य दिव्य स्वागत त्यानंतर विश्राम गृह येथे विश्रांती व जेवण त्यानंतर सायंकाळी पाच वाजता इर्विन चौक येथे सर्वधर्मीय व सर्व राजकीय पक्ष यांच्याकडून स्वागत त्यानंतर श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ येथे सलामी रवीवरी बडनेरा येथे स्वागत व नंतर यवतमाळ कडे प्रस्थान.

# ५.२४ लाख विद्यार्थ्यांची 'आधार' पडताळणी प्रलंबित

## ३० सप्टेंबरपर्यंतच्या विद्यार्थी संख्येनुसार शिक्षकांची संचमान्यता होणार; संघटनांकडून तीव्र संताप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

राज्यातील शाळांमधील शिक्षकांची संचमान्यता आता विद्यार्थ्यांच्या वैध आधार पडताळणीवर अवलंबून राहणार आहे. शिक्षण विभागाने १८ ऑगस्ट रोजी जारी केलेल्या आदेशानुसार, ३० सप्टेंबरपर्यंतच्या पटावरील एकूण विद्यार्थ्यांपैकी फक्त आधार व्हेरिफिकेशन पूर्ण झालेल्यांच्याच आकडेवारीवरून शिक्षकांची संचमान्यता निश्चित होईल. यामुळे शिक्षक संघटनांमध्ये प्रचंड संताप आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.सध्या राज्यातील तब्बल ५ लाख २४ हजार विद्यार्थ्यांची आधार पडताळणी अपूर्ण असल्याचे स्पष्ट झाले आहे. यामुळे अनेक शाळांच्या विद्यार्थ्यांची अधिकृत संख्या घटणार असून, त्याचा थेट परिणाम शिक्षकांच्या पदांवर होणार आहे.मुख्याध्यापक संघटनेचे माजी उपाध्यक्ष महेंद्र गणपुले यांनी सांगितले की, शिक्षण विभाग बचतीच्या नावाखाली शिक्षकांची पदे कमी करण्यासाठी आधार पडताळणीचे आडोसे घेत आहे. शासनाने तातडीने सर्व विद्यार्थ्यांना आधार व्हॅलिडेशनसाठी मुदतवाढ द्यावी. अशी मागणी शिक्षक संघटनांकडून होत आहे.



**संघटनांची भूमिका**

प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे म्हणाले, वर्गामध्ये विद्यार्थी प्रत्यक्ष उपस्थित असतात. परंतु आधार कार्डावरील नाव, अक्षरातील चूक किंवा तांत्रिक त्रुटींमुळे तो अवैध ठरतो. शिक्षण विभागाने याकडे गांभीर्याने पाहून योग्य कार्यवाही करावी.तर समितीचे राज्य प्रसिद्धी प्रमुख राजेश सावरकर यांनी सांगितले, वैध आधार या निकषामुळे हजारो शिक्षक अतिरिक्त ठरणार आहेत. याबाबत न्यायालयात खटला प्रलंबित आहे. निकाल आल्यानंतरच निर्णय घ्यावा, अन्यथा मोठा अन्याय होईल.

# शिक्षणाच्या मंदिरात विदारक अव्यवस्था

## कोट्यवधींचा खर्च, पण विद्यार्थी बेघरासमान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२डोमा**

मेळघाटातील डोमा येथील शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थी अक्षरशः हालअपेष्टा सहन करीत शिक्षण घेत असल्याचे हृदय पिळवटून टाकणारे वास्तव अनुसूचित जमाती कल्याण समितीच्या पाहणीतून समोर आले. शाळेच्या छतावर कपडे वाळवले जात होते, खिडक्यांतून आत शिरलेल्या पावसामुळे गाद्या भिजून चिखलासमान झाल्या होत्या. अभ्यासासाठी लागणारी पुस्तके, गणवेशांचा पत्ता नाही. अशा दारुण परिस्थितीत लाखो रुपये खर्च होऊनही 'विद्यार्थ्यांचे भवितव्य कोरडे' होत असल्याचे चित्र पाहून समिती सदस्यांसह गावकरी संतप्त झाले.



एका वर्गखोलीत तब्बल ७० विद्यार्थी, त्यात फक्त ३ जणांच्या बेंचवर ६ विद्यार्थी कोंबले गेलेले. पंखेविरहित वर्गखोल्या व वसतिगृहात श्वास गुदमरतो. डबल डेकर पलंग आहेत पण शिडी नाही; मुले जीव धोक्यात घालून चढतात-उतरतात. निवासाची व्यवस्था ही अक्षरशः गुरांसमान असल्याचे सदस्यांनी पाहिले.अकरावीच्या विद्यार्थ्याला जन्मतारीख विचारली असता तो फक्त वर्ष सांगू शकला. स्टँड अप या इंग्रजी शब्दाचा विद्यार्थ्यांनी स्टॅन्डअप्स असा उच्चार केल्याने शिक्षणाच्या गुणवत्तेचे दारुण चित्र समोर आले.

विद्यार्थ्यांच्या भविष्याची गाडी थांबवणारे आणखी एक वास्तव समितीच्या पाहणीत उघड झाले. वाचनालयाला कुलूप, संगणक कक्ष मात्र उघडला गेला नाही. तब्बल २० मिनिटे वाट पाहूनही जबाबदार अधिकारीच गायब होते. विद्यार्थ्यांना जेवणासाठी व्हरांड्यात व पटांगणात बसावे लागत असल्याची विदारक स्थितीही समितीने पाहिली.

या सर्व प्रकारामुळे समिती प्रमुख आमदार दौलत दरोडा, सदस्य आमदार केवराम काळे, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद सीईओ यांनी प्रचंड संताप व्यक्त केला. मुख्याध्यापक व जबाबदारांवर कारवाईची सूचना देत चौकशी समिती नेमण्याचे आदेश तातडीने देण्यात आले.

मेळघाटासाठी कोट्यवधींचा निधी खर्च होतो, तरीही विद्यार्थी मूलभूत सुविधांशिवाय राहत असल्याचे चित्र हे प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर थेट प्रश्नचिन्ह उपस्थित करणारे आहे. गावातील नागरिक, सरपंच ललिता बेठेकर, रामलाल काळे, सहदेव बेलकर यांनी देखील संताप व्यक्त करून विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी ठोस पावले उचलण्याची मागणी केली.

# सरन्यायाधीश गवईंच्या बंधूंचा न्यायालयात जाण्याचा इशारा, धर्मगुरू भदंत ससाईंना आव्हान

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२२नागपूर**

सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी काही दिवसांपूर्वीच नागपूरच्या दीक्षाभूमी येथील डॉ. आंबेडकर महाविद्यालयाच्या कार्यक्रमाला भेट दिली होती. हे महाविद्यालय उभारण्यात त्यांच्या वडिलांचा मोठा वाटा आहे. सध्या सरन्यायाधीशांचे बंधू डॉक्टर राजेंद्र गवई हे या संस्थेचे सदस्य सचिव आहेत. मात्र मागील काही दिवसांपासून संस्थेमध्ये वाद उफाडला असून या विरोधात राजेंद्र गवई यांनी बंडाचे पाऊल उचलले आहे.

दीक्षाभूमी परिसरातील डॉ. आंबेडकर महाविद्यालयातील प्राध्यापिकेच्या मानसिक छळ प्रकरणाने आता नवीन रंग घेतला आहे. आरोपींवर कारवाई करण्यापेक्षा महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी प.पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष भदंत सुरई ससाई यांच्या आदेशाने पीडित प्राध्यापिकेला कारणे दाखवा आणि निलंबन करण्याची नोटीस बजावली. याउलट आरोपींना संरक्षण दिले. त्यामुळे महाविद्यालयात सुरू असलेल्या संपूर्ण गोंधळाला अध्यक्ष ससाई जबाबदार असून आमच्याकडे बहुमत असल्याने न्यायालयात जाऊन अध्यक्षांवर अविश्वास आणू, असा इशारा स्मारक समितीचे सदस्य डॉ. राजेंद्र गवई आणि विलास गजघाटे यांनी दिला. प्रेस क्लबमधील पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

# सोन्याच्या बांगड्या चोरीप्रकरणी पोलिसांची धडाकेबाज कारवाई

## ४८ तासांत दोन्ही महिला आरोपी गजाआड



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

शहरातील रायली प्लॉट येथील बजरंगलाल छोटेलाल वर्मा ज्वेलर्स दुकानात दोन अनोळखी बुरखा घातलेल्या महिलांनी खरेदीच्या बहाण्याने सोन्याच्या दोन बागड्या (वजन ५५.७०० ग्रॅम, किमती ५,५५,००० रुपये) लंपास केल्या. दुकानातील महिला कर्मचाऱ्याचे लक्ष विचलित करून केलेल्या या चोरीचा प्रकार दुकानातील सीसीटीव्ही कॅमेरात स्पष्ट दिसला.

फिर्यादी चंद्रशेखर बजरंगलाल वर्मा (वय ५२) यांच्या तक्रारीवरून सिटी कोतवाली पोलिसांनी अप.क्र. २८९/२५ नोंदवून भा.दं.वि. कलम ३०३(२), ३(५), ३०५(अ), ३२९(४) अन्वये गुन्हा दाखल केला.

गुन्ह्याच्या तातडीच्या तपासासाठी दोन स्वतंत्र पथके नेमण्यात आली. आरोपींचे कोणतेही ठोस वर्णन अथवा शारीरिक वैशिष्ट्ये उपलब्ध नसतानाही पोलिसांनी कसून तपास करून अवघ्या ४८ तासांत दोन्ही महिला आरोपींना मालेगाव (जि. नाशिक) येथून ताब्यात घेतले. त्यांच्या ताब्यातून चोरीस गेलेल्या सोन्याच्या दोन बागड्या जप्त करण्यात आल्या.

ही कारवाई पोलीस आयुक्त मा. अरविंद चावरीया, उपायुक्त परिमंडळ-२ श्याम घुगे, स.पो.आ. संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनोहर कोटनाके, पोलीस निरीक्षक (गुन्हे) रामदास पालवे, पो.उप.नि. तुषार गावंडे, रंगराव जाधव तसेच पोहेकॉ. हरिष बुंदेले, घनशाम यादव, दीपक श्रीवास, मपोहेकॉ. सुकेशनी चक्रनारायण, नापोकॉ. प्रमोद हरणे, प्रदीप राठोड, पोकॉ. अथर अली बेग, मंगेश दिघेकर, आकाश इंगोले, बाबुसींग राठोड व मपोकॉ. मोनाली मोकळकर यांनी केली.पोलिसांच्या या जलदगती कारवाईचे शहरात सर्वत्र कौतुक होत आहे.

# नागपुरातील मारबत उत्सवात डोनाल्ड ट्रम्प, स्मार्ट मीटर निशाण्यावर पहलगामचा दहशतवाद हल्लाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२नागपूर**

ऐतिहासिक वारसा आणि लोकभावनांचा संगम असलेला नागपूरचा मारबत उत्सव यंदा विशेष गाजणार आहे. शनिवारी (२३ ऑगस्ट २०२५) साजरा होणाऱ्या या उत्सवात शहरातील विविध मंडळे समाजातील ज्वलंत प्रश्नांवर प्रहार करणारे बडगे उभारत आहेत. यावर्षीचे बडगे दहशतवाद, महागाई, भ्रष्टाचार, स्मार्ट मीटर, व्यसनाधीनता अशा विषयांवर लक्ष केंद्रीत करणार आहे.



महोत्सवातील देखाव्यात अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा प्रतीकात्मक पुतळ्यासह काय राहणार? याबाबत आपण जाणून घेऊ या.

अलीकडेच जम्मू आणि काश्मीरमधील पहेलगामजवळ भारतीय पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यामुळे दहशतवाद्यांसह अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या भारतावर लादलेल्या अवास्तव कराच्या धोरणावरही टीका केली जाणार आहे. त्यामुळे यंदा नागपूरकरांची घोषणाबाजी केवळ स्थानिकच नव्हे तर आंतरराष्ट्रीय प्रश्नांनाही स्पर्श करणार आहे. नागपुरातील नेहरू पुतळा चौक, कोतवाली चौक, गांधी पुतळा चौक, व्हीटी पार्क चौक, अमरावती रोडसह विविध भागांतून बडगे मिरवणुकीत सहभागी होणार आहेत. शहरातील विविध मंडळाच्या तरुण कार्यकर्त्यांच्या मंडळांनी यंदा मारबत महोत्सवात महागाई, वाढते वीजबिल, स्मार्ट मीटरची समस्या, तसेच वाढत्या व्यसनाधीनतेवर जनजागृती करणारे पुतळे उभारले आहेत. यामधून नागरिकांनी प्रशासन आणि सरकारला दिलेला थेट संदेश लक्षवेधी ठरणार आहे.

यंदा विशेषतः महागाईमुळे त्रस्त झालेल्या सर्वसामान्यांचे दुःख, तसेच स्मार्ट मीटरच्या बिलांबद्दलचे असंतोष हे मोठ्या प्रमाणावर व्यक्त होणार आहेत.